POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१३६ ● मुंबई, गुरुवार, १८ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA


### निवडणूक अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणेचा अध्यादेश काढणार

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४ (२) मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका वेळेत आणि कालबध्द रितीने व्हाव्यात या दृष्टीने हा निर्णय महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातील कलम १४ मध्ये, पोट-कलम (२) अंतर्गत उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल करता येत होते. मात्र विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशी अनेक अपीले प्रलंबित राहत असल्याने निवडणुका कालबद्धरित्या घेणे शक्य होत नसल्याने हा निर्णय घेण्यात आला. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने शासनास या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनास अशा निवडणुकांबाबत नियम करता येतील, तसेच उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल, अशी कलमे यात समाविष्ट करण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ काढण्यास बैठकीत मंजूरी देण्यात आली.

## जिल्हापरिषद निवडणुकीआधी कायद्यात मोठा बदल
## राज्य मंत्रिमंडळ बैठकीत २ सर्वात मोठे निर्णय!

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

सध्या राज्यात महानगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी रंगली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार महापालिकांच्या निवडणुकीसाठी येत्या 15 जानेवारी रोजी मतदान होईल. तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर केला जाईल. यावेळी मुंबई महापालिकेची निवडणूक ही इतर महापालिकांच्या निवडणुकीसोबतच होणार आहे. असे असतानाच आता राज्य सरकारने निवडणूक अधिनियम 1961 या कायद्यात मोठी सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यात सुधारणेचा अध्यादेश काढला जाणार असून या अध्यादेशाद्वारे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी अजार्बाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे. सोबतच गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारक



परिसरातील अतिक्रमणे रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारकांच्या ठिकाणांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार सांस्कृतिक कार्य विभागाच्या यापूर्वीच्या (दि. २० जानेवारी २०२५) शासन निर्णयातील गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणे काढण्याबाबतच्या तरतूदींची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. यामध्ये आता राज्य संरक्षित स्मारकांचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील सर्व गड-किल्ले तसेच राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी व भविष्यातील अतिक्रमणे रोखण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. समितीचे सांस्कृतिक कार्य मंत्री अध्यक्ष असतील. तर समितीमध्ये महसूल मंत्री, ग्रामविकास मंत्री, पर्यटन मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, वन मंत्री, बंदरे व विकास मंत्री तसेच संबंधित विभागांचे सचिव, प्रधान सचिव किंवा अपर मुख्य सचिव यांचा समावेश असणार आहे.

राज्यस्तरीय समितीमध्ये चार निमंत्रित सदस्यांचा समावेश करण्यास तसेच प्रत्येक जिल्ह्यात गठीत करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय समितीमध्ये चार अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. हे अशासकीय सदस्य गड-किल्ले व राज्य संरक्षित स्मारकांचे अभ्यासक असावेत किंवा संरक्षण व संवर्धनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेली व्यक्ती अथवा स्वयंसेवी संस्था असावी, अशी अट ठेवण्यात आली आहे. जिल्ह्यातील गड-किल्ले व राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे रोखणे व ती काढून टाकण्याची कारवाई संबंधित जिल्हाधिकारी यांना त्या-त्या जमिनीच्या मालकीच्या विभागाच्या समन्वयाने करावी लागणार आहे. तसेच यासाठीचा खर्च जिल्हा नियोजन व विकास निधीमधून करता येणार आहे.



### राज आणि उद्धव ठाकरेंकडून बीएमसीबाबत महत्त्वाची घोषणा... मनसे नेत्याने काय सांगितलं?

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या युतीची अधिकृत घोषणा पुढील दोन दिवसांत केली जाणार आहे. दोन्ही पक्षांतील जागावाटप जवळपास निश्चित झाले असून, याबाबतची माहितीही यावेळी देण्यात येईल. उद्धव आणि राज ठाकरे एकत्रितरीत्या या संदभार्तील घोषणा करतील, असे मनसेच्या एका ज्येष्ठ नेत्याने मंगळवारी ह्यमहाराष्ट्र टाइम्सह्लला सांगितले. शिवसेना (उबाठा) पक्षाचे नेते संजय राऊत आणि अनिल परब यांनी युती आणि जागावाटपासंदभार्तील ह्यशिवतीर्थाह्लवर चर्चा केली. या दोन्ही नेत्यांनी राज यांच्याशी चर्चा केली. राज ठाकरे आज, बुधवारी त्यांच्या नेत्यांशी सविस्तर चर्चा करतील व साधारण गुरुवारी ठाकरे बंधू युतीची घोषणा करतील, असे मनसेच्या ज्येष्ठ नेत्याने सांगितले. दरम्यान, ठाकरे बंधूंची युती हा गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणातील सर्वाधिक चचेर्चा विषय ठरला आहे. अखेर आता या युतीला मूर्त स्वरुप मिळत असल्याने दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून समाधान व्यक्त केलं जात असून मुंबई महानगरपालिका निवडणुकीत कोणाच्या वाट्याला किती जातात येतात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## डायरेक्ट मकोका लागणार!
### सरकारच्या एका निर्णयामुळे गुटखा उत्पादकांचे धाबे दणाणले

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यात गुटखा बंदी असतानाही शाळा परिसर, महाविद्यालय परिसरांसह अनेक ठिकाणी गुटखा आढळून येतो. त्यामुळे गुटखा बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी मकोका लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या मकोका लावण्यासाठीच्या प्रस्तावात आवश्यक त्या दुरुस्त्या कायद्यात करण्यात येणार आहेत. त्यानंतर येत्या नवीन वर्षात गुटखा उत्पादकांवर मकोका लागणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.

यापूर्वी गुटखा उत्पादक व विक्रेत्यांवर मकोका लावण्यासाठीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठवण्यात आला होता. मात्र कायद्यातील तरतुदींनुसार ''हार्म आणि हर्ट'' या दोन्ही घटकांअभावी तो लागू होत नाही. त्यामुळे या कायद्यात बदल करण्यात येऊन गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवरही मकोका लागू करता येईल, अशा आवश्यक दुरुस्त्या कायद्यात




करण्यात येऊन हा कायदा अधिक कठोर करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती.

त्यानुसार नागपूरचे हिवाळी अधिवेशन संपताच अन्न व औषध प्रशासन विभाग कामाला लागले आहे. गुटखा उत्पादकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष धोरण आणणार, कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी दुरुस्ती प्रस्ताव आणण्यात येणार असल्याचेही मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले.

गुटखा बंदी कायदा कठोर करण्यासाठी व मकोका लावण्यासाठी त्यात आवश्यक ते बदल करून सुधारित प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे लवकरात लवकर पाठविण्याचे निर्देश मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अधिकाऱ्यांना दिले.

## गायब झालेल्या 'त्या' मुलीचा मृदेह सापडला!
### गावाच्या वेशीवर दप्तर तर मृतदेह... गूढ वाढलं! चाळीसगावात तणाव

■जळगाव। प्रतिनिधी,

जळगावमधील चाळीसगाव तालुक्यातील बेपत्ता विद्यार्थीनींचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. शुक्रवारपासून बेपत्ता असलेल्या या ९ वर्षांच्या मुलीचा मृतदेह तरवाडे बुद्रुक गावाजवळच्या विहिरीमध्ये सापडला आहे. मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली असून गावात तणावपूर्ण वातावरण आहे. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर चार दिवसांनी तिचा मतदेह सापडला असल्याने तिच्यासोबत नेमकं काय घडलं याबद्दलचं गूढ वाढलं आहे.

१२ डिसेंबर रोजी शाळेतून घरी परतताना ही मुलगी रहस्यमयरित्या बेपत्ता झालेली. शुक्रवार सायंकाळपासून तिचा शोध सुरु होता. अखेर हा शोध अगदीच अनपेक्षितपणे संपला जेव्हा गावाजवळील विहिरीत तिचा मृतदेह आढळून आला. मुलीचा मृतदेह सापडल्याची माहिती मिळताच जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून मृतदेह ताब्यात घेऊन




### अखेर पोलिसांना कळवलं

सदर मुलगी शुक्रवारी (१२ डिसेंबर २०२५) सकाळी नेहमीप्रमाणे शाळेत गेली होती. मात्र सायंकाळपर्यंत ती घरी परतली नाही. कुटुंबीयांनी आणि नातेवाइकांनी तिचा सर्वत्र शोध घेतला, मात्र कोणतीही ठोस माहिती मिळाली नाही आणि या प्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली. गावातील स्थानिक नागरिक, नातेवाईक आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाकडून शोधमोहीम राबवली जात होती. आज सकाळी या मुलीचा शोध घेताना तिचा मृतदेह विहिरीत आढळून आला.

शवविच्छेदनासाठी पाठवण्यात येणार आहे. शेवटची माहिती हाती आली तेव्हा तिचा मृतदेह विहिरीमधून बाहेर काढण्याचं काम सुरु होतं. शवविच्छेदनानंतरच तिचा मृत्यू नेमका कसा झाला याबद्दलची माहिती मिळू शकते. गावात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून गावात तणावपूर्ण शांतता आहे.

गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता चौथीत शिकणारी ही मुलगी शुक्रवारी सकाळी १० वाजता शाळेत गेली होती. शाळा सुटल्यानंतर घरी न परतल्याने पालकांनी शोध घेतला, मात्र तिचा मागमूस लागला नाही, अशी माहिती समोर आली आहे. तिचे शाळेचे दप्तर गावाच्या वेशीबाहेर आढळले आहे, ज्यामुळे अपहरणाची शंका व्यक्त होत असतानाच तिचा मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली आहे.

गावातील चौकात लावलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये ती बॅग घेऊन चालत असल्याचं दिसून आलं. यानंतर ती कोणालाही दिसली नाही. त्यामुळे ती कोणासोबत गेली? तिच्यासोबत नेमकं काय झालं? असे अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित असून पोलीस या प्रकरणासंदर्भातील प्रश्नांची उत्तरं शोधत आहेत.

### नेमकं काय घडलं?

अंबरनाथ पश्चिमेकडील नवीन भेंडी पाडा या परिसरात पवन वाळेकर यांचे कार्यालय आहे. बुधवारी रात्री १२.१५ च्या सुमारास भाजप उमेदवार पवन वाळेकर हे कार्यकर्त्यांसोबत कार्यालयात उपस्थित होते. त्याचवेळी दोन अज्ञात व्यक्ती दुचाकीवरुन आल्या आणि त्यांनी कार्यालयाच्या दिशेने गोळीबार करण्यास सुरुवात केली. यावेळी हल्लेखोरांनी कार्यालयावर कमीतकमी ४ ते ६ राऊंड फायर केले. सुदैवाने या गोळ्या कार्यालयाच्या समोरच्या काचेवर आणि काही भागांवर लागल्या. तसेच गोळीबार सुरू होताच वाळेकर आणि कार्यकर्त्यांनी तात्काळ सावधगिरी बाळगल्याने कोणालाही दुखापत झाली नाही. त्यामुळे जीवितहानी टळली. गोळीबार केल्यानंतर हल्लेखोर तातडीने घटनास्थळावरून पसार झाले. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या घटनेत एका दुचाकीवरुन दोन दुचाकीस्वार हे तोंडाला कपडा आणि हेल्मेट घातले होते. या दोघांनीही पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान केले होते. त्यानतंर त्यातील एक जण उतरला. त्याने बंदूक काढली आणि थेट पवन वाळेकर यांच्या कार्यालयावर गोळीबार करायला सुरुवात केली. यानंतर ते दोघेही पळून गेले. या गोळीबाराच्या घटनेमुळे राजकीय वतुळात मोठी खळबळ उडाली आहे. निवडणुकीच्या तोंडावर दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने हा हल्ला करण्यात आल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## तोंडाला पांढरा कपडा, बंदूक काढली अन्...
### ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजप कार्यालयावर गोळीबार



■अंबरनाथ। प्रतिनिधी,

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे बिगुल सध्या वाजले आहे. येत्या १५ जानेवारीला महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांसाठी मतदान पार पडणार आहे. तर १६ जानेवारीला या निवडणुकांचा निकाल जाहीर केला जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर सध्या राज्यात राजकीय भेटीगाठी, युती-आघाडी, जागावाटप आणि पक्षांतरच्या घटना वेगाने घडत आहेत. त्यातच अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा टप्पा सुरु असतानाच भाजपचे उमेदवार पवन वाळेकर यांच्या खाजगी कार्यालयावर अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

या घटनेमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या घटनेचा थरार सीसीटिव्हीमध्ये कैद झाला आहे.

#### पोलिसांकडून तातडीने तपास

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला आहे. या गोळीबार प्रकरणी अंबरनाथ पश्चिम पोलीस ठाण्यात अज्ञात हल्लेखोरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दहशत निर्माण करणे किंवा उमेदवाराला धमकी देणे हा या गोळीबारामागील मुख्य उद्देश असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. हा संपूर्ण प्रकार कार्यालयाच्या परिसरात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. पोलिसांनी फुटेज ताब्यात घेतले असून, त्याआधारे हल्लेखोरांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत, पोलिस प्रशासनाने तात्काळ सूत्रे हलवली आहेत. आरोपींना लवकरात लवकर पकडण्यासाठी स्थानिक अंबरनाथ पोलीस पथकासह, बदलापूर पोलीस पथक आणि गुन्हे शाखेचे विशेष पथक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही पथके वेगवेगळ्या दिशेने आरोपींचा शोध घेत आहेत. आरोपींना शहरातून पळून जाण्यापासून रोखण्यासाठी परिसरातील प्रमुख रस्त्यांवर आणि नाक्यांवर तात्काळ नाकाबंदी करण्यात आली आहे. तसेच गोळीबार झालेल्या नवीन भेंडी पाडा परिसरातील रस्ता पोलिसांनी सील केला असून फॉरेन्सिक विभागाकडून पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. सध्या पोलिसांकडून आरोपींचा कसून शोध सुरू आहे. या घटनेमागे नेमका कोणाचा हात आहे आणि त्याचा निवडणुकीशी काय संबंध आहे, याचा तपास सुरू आहे.

## बोरीवली गावात ईडी, आयकर विभाग आणि एटीएसची संयुक्त छापेमारी



■भिवंडी। प्रतिनिधी,

मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील बोरीवली गावात रात्रीपासून ईडी,आयकर विभाग आणि एटीएस यांनी गुरुवारी पहाटे पासून संयुक्त छापेमारी सुरू केली आहे. दहशतवादी कृत्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारांच्या तपासाच्या अनुषंगाने गावातील अनेक निवासी घरांवर ही कारवाई होत आहे. ही कारवाई सुरू असताना गावात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गावाबाहेरील मैदानात या कारवाई मध्ये सहभागी वीस हून अधिक कारचा ताफा उभा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडीतील पडघा, पुणे,मालेगाव यांसह महाराष्ट्रातील सुमारे ४० ठिकाणी सर्च ऑपरेशन मोहीम राबवली जात आहे. आयएसआयएस टेरर मॉड्यूलशी संबंधित संशयित आर्थिक हालचालींच्या तपासात ही कारवाई केली जात असल्याची माहिती समोर येत आहे. एनआयएने दाखल केलेल्या प्रकरणाच्या आधारे ईडीने अलीकडेच (इसीआयआर) नोंदवला असून हा तपास साकिब नाचन प्रकरणाशी जोडला गेला आहे. २८ जून रोजी कारागृहात मृत्यू झालेल्या साकिब नाचनच्या दफनविधीनंतर एटीएसची ही पहिली मोठी कारवाई मानली जात आहे. एटीएस सह ईडी आणि आयकर विभागाने संयुक्त ऑपरेशनल ग्रिड तयार करून मिळालेल्या माहितीच्या आधारे तातडीने कारवाई केली आहे. या कारवाईमुळे बोरिवली गाव पुन्हा एकदा चर्चेत आला असून संपूर्ण गावाला पोलिसांच्या छावणीचे स्वरूप आले आहे तसेच पुढील तपास सुरू आहे.

## राजस्थानमधील ड्रग्स फॅक्टरी उध्वस्त...१०० कोटींचा ड्रग्स आणि मुद्देमाल जप्त

■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा- भाईंदर अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलिसांनी राजस्थान राज्यातील झुनझुन येथे एमडी ड्रग्स बनवण्याची फॅक्टरी उघडकीस आणून ती उध्वस्त करून एमडी ड्रग्स बनवण्यासाठी लागणारी रसायने साधनसामग्री असा १०० कोटींचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक झ १ यांनी केली आहे. तर यात आतापर्यंत ११ आरोपींना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे.

याआधी मिरा-भाईंदर अंमली पदार्थ विरोधी पथक १ ने ४ ऑक्टोबर रोजी काशीगाव पोलीस ठाण्यात एमडी ड्रग्स विक्रीचा गुन्हा दाखल करत सहा जणांना अटक केली होती.त्यात १ कोटी ३२ हजार रुपयांचा ५०१.६ ग्राम एमडी ड्रग्ज आणि



रोख रक्कम जप्त करण्यात आली होती.त्यानंतर पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कसून तपास करत राजस्थानमधील झुनझुन येथे एमडी ड्रग्स बनवणार्या ड्रग्स फॅक्टरीपर्यंत तपास करत अजून ४ आरोपींना अटक केली आहे. तसेच त्यांच्याकडून २० लाख रुपये किंमतीच्या दोन चार चाकी कार आणि एक मोटरसायकल तसेच गुन्ह्यात वापरलेले २ लाख ५ हजार किंमतीचे ६ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

त्यानंतर पोलिसांनी झुनझुन येथे पोल्ट्री फॉर्मच्या मागे काही दिवस रेकी करून त्या ठिकाणी छापा मारत ११ वा आरोपी अनिल सिहाग याला अटक केली.यावेळी१० किलो एमडी ड्रग्ज पावडर आणि त्याठिकाणी प्री-कर्सर रसायने तसेच एमडी ड्रग्स बनविण्याची आवश्यक ती साधनसामग्री त्यात प्लाक, मिक्सर, ड्रायर मशीन, वजन काटा, हॅन्डग्लोव्ह, फिल्टर व इत्यादी असे शंभर कोटींचे साहित्य मिळून आले आहे. तर सदरची ड्रग्ज फॅक्टरी गेल्या एका वर्षापासून कार्यरत असल्याची माहिती पोलीस आयुक्तांनी दिली आहे. त्यात आतापर्यंत १०० कोटी रुपयांच्या ड्रग्जचा पुरवठा महाराष्ट्रासह इतर राज्यात झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपींमध्ये अंडरवर्ल्ड कनेक्शन असलेले आणि त्या टोळीत सक्रिय सहभाग असलेले आरोपी आहेत. त्यांच्यावर हत्या, ड्रग्ज विक्री, आर्म्स ॲक्ट असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सदरची कारवाई ही पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समीर शेख यांच्या टीमने केली आहे.

### महाविद्यालयीन सहल अर्ध्यावरच रद्द... ८ विद्यार्थी रुग्णालयात दाखल
## कथित भुतामुळे विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

उल्हासनगरमधील एका नामांकित महाविद्यालयाच्या सात दिवसीय शैक्षणिक सहलीदरम्यान घडलेल्या अनपेक्षित घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घबराट निर्माण झाली. सहलीदरम्यान कथित 'भूत दिसल्याच्या' अफवांमुळे वातावरण तणावपूर्ण बनल्यानंतर काही विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली आणि अखेर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महाविद्यालय प्रशासनाला सहल अर्ध्यावरच रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागला.

सहलीच्या पहिल्याच दिवसापासून काही विद्यार्थ्यांना अस्वस्थ वाटत असल्याचे सांगण्यात येत होते. मात्र एका रात्री अचानक अनेक विद्यार्थ्यांना चक्कर येणे, घाबरल्यासारखे वाटणे, श्वास घेण्यास त्रास होणे, अशा तक्रारी वाढल्या.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाविद्यालय प्रशासनाने नियोजित वेळेच्या दोन दिवस आधीच सहल थांबवण्याचा निर्णय घेतला. एका विद्यार्थिनीने सांगितले की, कॅम्पच्या सुरुवातीपासूनच वातावरण काहीसे वेगळे वाटत होते. मात्र कथित भुताच्या चर्चा सुरू झाल्यानंतर



सदर महाविद्यालयाची सात दिवसांची शैक्षणिक सहल सुरू असताना उशिरा रात्री काही विद्यार्थ्यांनी विचित्र अनुभव आल्याचे सांगत कथित भुतासारखी आकृती दिसल्याची चर्चा सुरू केली. ही चर्चा काही वेळातच संपूर्ण कॅम्पमध्ये पसरली आणि विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

आणि काही विद्यार्थी आजारी पडू लागल्यावर सर्वांमध्ये भीती पसरली.

#### सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर

ही घटना कोणत्याही अलौकिक कारणामुळे नसून मानसिक तणाव आणि भीतीमुळे निर्माण झालेल्या घबराटीच्या (पॅनिक) अवस्थेमुळे घडल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून सात ते आठ विद्यार्थ्यांना उल्हासनगरमधील मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मतदार याद्यांचे शुद्धीकरण आणि घुसखोरीचे संकट



**मतदार यादी शुद्धीकरण मोहीम ही लोकशाही बळकट करण्यासाठी आवश्यक असलेली घटनात्मक प्रक्रिया आहे. मात्र तिच्याविरोधात पसरवली जाणारी दिशाभूल देशभर वाद निर्माण करत आहे.**

केंद्रीय निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेचा मुद्दा देशभर चर्चिला जात आहे. मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाचा मुद्दा देशात होणाऱ्या घुसखोरीशी निगडित आहे. मतदार याद्यांच्या पडताळणी विरोधात गेल्या काही महिन्यांपासून पद्धतशीरपणे खोटीनाटी माहिती पसरवली जात आहे. संविधानाने खुल्या आणि निःपक्ष वातावरणात निवडणुका घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाची निर्मिती केली. त्याचबरोबर मतदार याद्या तयार करणे आणि गरजेनुसार त्यात दुरुस्त्या करणे याची जबाबदारी निवडणूक आयोगावर सोपविली आहे. देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपासून राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीपर्यंत सर्व निवडणुका केंद्रीय निवडणूक आयोगामार्फतच घेतल्या जातात. संविधानातील कलम ३२५ मध्ये कोणताही पात्र मतदार मतदान करण्यापासून वंचित राहू नये, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे; तर ३२६ मध्ये मतदाराची पात्रता आणि कोणाला मतदान करता येते, याबाबतच्या अटी नमूद करण्यात आल्या आहेत. यातील पहिली अट अशी आहे की, मतदार हा भारताचा नागरिक असावा, तो कोणत्याही परदेशाचा नागरिक नसावा. घटनेतील ३२७ व्या कलमात केंद्रीय निवडणूक आयोगाला मतदार याद्या तयार करण्याबाबतचे सर्वाधिकार देण्यात आले आहेत. १९५२, १९५७ आणि १९६१ मध्येही केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या शुद्धीकरणासाठी मोहीम उघडली होती. त्यावेळी काँग्रेस पक्ष सत्तेवर होता. २००४ मध्ये निवडणूक आयोगाने अशीच मोहीम राबविली होती. त्यानंतर २१ वर्षांनी मतदार याद्यांच्या शुद्धीकरणासाठी निवडणूक आयोग काम करत आहे. यापूर्वी अनेकदा अशी मोहीम होऊनही त्याविरोधात कुणीच बोलले नव्हते. यावेळी मात्र विरोधी पक्षांना अचानक कंठ फुटला आहे. मतदार याद्यांमधील किरकोळ चुका दुरुस्त करण्याबरोबरच संविधानाने जे मतदारच होऊ शकत नाहीत, अशा नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. त्यानुसार मतदार याद्यांच्या सखोल पडताळणी मोहिमेत दुबार मतदारांची नावे वगळणे, निधन झालेल्या व्यक्तींची नावे वगळणे तसेच १८ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींची नावे समाविष्ट करणे अशी कामे मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेत केली जाणार आहेत. त्याचबरोबर अन्य देशातून भारतात घुसलेल्या ज्या व्यक्तींनी मतदार यादीत नाव नोंदवलेले आहे अशा व्यक्तींची नावे शोधून ती नावे मतदार यादीतून वगळण्याचे कामही या मोहिमेत केले जाणार आहे. काही पक्षांचे राजकीय हितसंबंध धोक्यात येत असल्यामुळे त्यांनी या अभियानाला विरोध सुरू केला आहे. पवन खेरा यांच्यासह अनेक विरोधी पक्षांतील नेत्यांची नावे दोनदा मतदार यादीत असल्याचे दिसून आले आहे. अशा चुका दुरुस्त करण्यासाठी निवडणूक आयोगाने हे अभियान हाती घेतले आहे. काँग्रेसचे नेते दुबार मतदारांची यादी पत्रकार परिषदेत वाचून दाखवतात. याच चुका दुरुस्त करण्यासाठी निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मोहिमेला मात्र काँग्रेसचे नेते विरोध करतात. काँग्रेस किंवा अन्य विरोधी पक्षांना एखाद्या निवडणुकीत विजय मिळाला की, त्यांना मतदार याद्या, मतदान यंत्रे (ईव्हीएम) याबाबत आक्षेप नसतो. मात्र बिहार व महाराष्ट्रासारखा मोठा पराभव झाला की, विरोधी पक्षांना मतदार याद्यांतल्या चुका दिसू लागतात. विरोधी पक्षांचे हे वर्तन अत्यंत अयोग्य आहे. भारतीय जनता पक्ष अनेक वर्षे विरोधी पक्ष म्हणून काम करत आहे. आम्हाला अनेकदा लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये लागोपाठ पराभव स्वीकारावे लागले आहेत. अशावेळी आम्ही मतदान यंत्रांवर (ईव्हीएम), मतदार याद्यांवर दोषारोप केले नव्हते. आम्ही आमच्या चुका दुरुस्त केल्या आणि मतदारांपुढे गेलो. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष सततच्या पराभवामुळे अस्वस्थ झाले आहेत. या अस्वस्थतेमुळेच विरोधी पक्षांकडून निवडणूक आयोगावर बेछुट आरोप होत आहेत. काँग्रेस सत्तेत असतानाच मतदान यंत्रांद्वारे मतदान घेण्याचा निर्णय झाला. आपला पराभव पचवता न आल्यामुळे विरोधी पक्ष मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेबाबत खोटीनाटी माहिती पसरवून जनतेत गैरसमज निर्माण करण्याचे प्रयत्न करत आहेत. मतदान यंत्रे हॅक होत असल्याचे आरोप काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी केले आहेत. मात्र एकाही पक्षाला ईव्हीएम हॅक होते हे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध करता आलेले नाही. घटनेतील लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ८१ नुसार पराभूत उमेदवाराला ४५ दिवसांत न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे. ज्यांना भाजपच्या विजयी उमेदवारांवर आक्षेप घ्यायचे असतील त्यांनी ४५ दिवसांच्या कालावधीतच घेणे आवश्यक आहे. या तरतुदीनुसारच निवडणूक आयोगाने ४५ दिवसांनंतर सीसीटीव्ही फुटेज नष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांना घुसखोरांची नावे मतदार यादीत हवीच आहेत. यासाठी ते मतदार याद्यांच्या शुद्धीकरण मोहिमेला विरोध करत आहेत. घुसखोरीमुळे आपली भाषा, संस्कृती, साहित्य अशा जीवनाच्या सर्व अंगांवर परिणाम होतो. त्यामुळे या विषयावर सर्वांनी गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. घुसखोरीच्या समस्येचे आकलन अनेकांना झालेले नाही. घुसखोरीमुळे विविध क्षेत्रावर होणारे गंभीर परिणाम सर्वांनीच विशेषतः युवा पिढीने जाणून घेण्याची आवश्यकता आहे. घुसखोरीमुळे देशाची सुरक्षा धोक्यात येते, त्याचबरोबर आपली संस्कृती, आपली भाषा आणि आपले स्वातंत्र्य धोक्यात येते. गेल्या काही वर्षांत घुसखोर भारताचे नागरिक बनल्यामुळेच देशातील मुस्लिम लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. घुसखोऱ्यांमुळे देशाच्या मूळ नागरिकांना नोकरी, रोजगारापासून वंचित रहावे लागते याकडे विरोधी पक्षांकडून मुस्लिम व्होट बँकेच्या मोहामुळे हेतूपूर्वक दुर्लक्ष केले जाते. या घुसखोरांची एकगठ्ठा मते मिळत असल्यामुळे काँग्रेस, तृणमूल काँग्रेस यांच्यासह अनेक विरोधी पक्षांना घुसखोरांविषयी ममत्व वाटते. मात्र हे ममत्व देशाच्या सुरक्षेला धोका उत्पन्न करणारे आहे याची जाणीव सामान्य नागरिकांनी ठेवलेली बरी.

# मेस्सीचा उदो उदो, पण भारतीय फुटबॉलची पाटी कोरी!

**स्वातंत्र्याच्या अगोदर आणि नंतर देशात फुटबॉलची स्थिती चांगली होती. १९५१ मध्ये भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेत विजय मिळवला होता, मात्र १९७० च्या दशकापासून आपली पीछेहाट होऊ लागली. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली पाटी कोरीच आहे. दीडशे कोटी लोकसंख्या असलेल्या भारताची ऑलिम्पिक स्पर्धांमधील कामगिरी पण काही खास नाही. लिओनेल मेस्सीचा उदो उदो करताना इथल्या सरकारी यंत्रणांनी आणि लोकांनी लक्षात घ्यावे लागेल की, मेस्सी आणि रोनाल्डो यांच्यासारखे खेळाडू आपल्याकडे बनण्यासाठी खूप काही करावे लागेल. त्यासाठी फुटबॉलला पोषक वातावरण तयार करून त्याला लागणाऱ्या पायाभूत सुविधा उभ्या कराव्या लागतील.**



स्वातंत्र्याच्या अगोदर आणि नंतर देशात फुटबॉलची स्थिती चांगली होती. १९५१ मध्ये भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेत विजय मिळवला होता, मात्र १९७० च्या दशकापासून आपली पीछेहाट होऊ लागली. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली पाटी कोरीच आहे. दीडशे कोटी लोकसंख्या असलेल्या भारताची ऑलिम्पिक स्पर्धांमधील कामगिरी पण काही खास नाही. लिओनेल मेस्सीचा उदो उदो करताना इथल्या सरकारी यंत्रणांनी आणि लोकांनी लक्षात घ्यावे लागेल की, मेस्सी आणि रोनाल्डो यांच्यासारखे खेळाडू आपल्याकडे बनण्यासाठी खूप काही करावे लागेल. त्यासाठी फुटबॉलला पोषक वातावरण तयार करून त्याला लागणाऱ्या पायाभूत सुविधा उभ्या कराव्या लागतील.

'आज सॉल्ट लेक स्टेडियमवर झालेल्या गैरव्यवस्थापनामुळे मला खूप त्रास झाला आहे आणि धक्का बसला आहे. त्यांच्या आवडत्या फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीची एक झलक पाहण्यासाठी गोळा झालेल्या हजारो क्रीडाप्रेमी आणि चाहत्यांबरोबर कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मी स्टेडियमच्या वाटेवर होते. मी लिओनेल मेस्सीची, तसेच सर्व क्रीडाप्रेमींची आणि त्याच्या चाहत्यांची मनापासून माफी मागते' हा माफीनामा आहे,पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा. या माफिनाम्यामागे परिस्थिती देखील तशीच आहे.

मेस्सी,मेस्सी या नावाचा घोष करीत कोलकात्यातील सॉल्ट लेक फुटबॉल स्टेडियमवर शनिवारी सुमारे ८० हजार प्रेक्षक उपस्थित होते. कोण सुमारे दोन दिवस सुट्टी काढून, तर कोण स्वतःच लग्न असताना आपला लाडका आणि फेव्हरिट अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू लिओनल मेस्सीला पाहण्यासाठी स्टेडियमवर हजर होता. तब्बल १२ हजार ते १८ हजार रूपयांचे तिकीट काढून हे सर्वजण या स्टेडियमवर हजर होते.आपल्या आवडत्या फुटबॉल प्लेयरची एक झलक पाहण्यासाठी सारे आसुसलेले होते. परंतु,मेस्सी स्टेडियमवर आला. केवळ ८ ते १० मिनिटे थांबला. सुरक्षा यंत्रणा, राजकारणी यांच्या गराड्यात मेस्सीचा चेहरादेखील स्टेडियमवर उपस्थित चाहत्यांना पाहता आला नाही. काही मिनिटातच मेस्सी स्टेडियमबाहेर निघाला. इतके महिने वाट पाहणाऱ्या चाहत्यांचा भ्रमनिरास झाला. त्यांचे पैसे तर पाण्यात गेलेच पण वेळही फुकट गेला. ते चिडले,त्यांनी स्टेडियममध्ये राडा केला. बाटल्या फेकल्या, उभारलेले तंबू तोडले, तोडफोड केली. कोलकात्यात मेस्सी आला, मेस्सी गेला. परंतु, मेस्सीच्या नावाने चाहत्यांकडून पैसे घेऊन जो काय इव्हेंट होणार होता, त्याचा अक्षरक्षः खेळखंडोळा झाला. मेस्सीच्या या दौऱ्याचे आयोजक सताद्रु दत्ता हे होते. ज्यांना चाहत्यांनी घातलेल्या या गोंधळानंतर अटक करण्यात आल्याचे देखील वृत्त आहे.

मेस्सी हा युनिसेफचा ब्रँड अँबेसेडर आहे आणि त्याचाच एक भाग म्हणून तो भारतात 'गोट' इंडिया टूरमध्ये सहभागी झाला होता. मेस्सी तब्बल १४ वर्षांनंतर भारतात आला. त्याचा तीन दिवस भारत दौरा होता. 'गोट' इंडिया टूर २०२५' चा भाग म्हणून चार शहरांमधील चाहत्यांना मेस्सीची भेट असे या दौऱ्याचे आयोजन होते. मेस्सी शनिवारी पहाटे १:३० वाजता कोलकाता विमानतळावर पोहोचला, त्याच्यासोबत बार्सिलोनाचा माजी खेळाडू लुईस सुआरेझ आणि अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू रॉड्रिगो डी पॉल होते. कोलकाता, हैदराबाद, मुंबई आणि नवी दिल्लीचादेखील त्याच्या दौऱ्यात समावेश होता.परंतु,त्याच्या या दौऱ्याच्या सुरूवातीलाच नियोजनाच्या बाबतीत किती ढिसाळपणा झालाय,हे दिसून आले. सरकारी यंत्रणाना गांभीर्य नसणं,त्यांच्याकडून योग्यरित्या नियोजन न केलं जाणं अशा बाबी उघड झाल्या. गांभीर्य नसणं आणि नियोजन नसणं यामुळे १५० कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या भारतात अर्जेंटिना, फ्रान्स, जर्मनी, ब्राझीलसारखे फुटबॉल संघ तयार झाले नाहीत, याचं उत्तर बहुदा अशा 'गोट' दौऱ्यांमुळे पुन्हा पुन्हा मिळत आलंय.

क्रिकेट हा भारतीयांचा सगळ्यात आवडता खेळ. त्याच्यापाठोपाठ हॉकी. परंतु,हॉकीला क्रिकेटसारखे ग्लॅमर हे नाहीच. भारतीय फुटबॉलची परिस्थिती तर त्याहून खराब. सध्या भारताची फिफा फुटबॉल क्रमवारी आहे १४२. भारताची ही क्रमवारी १७३ स्थानापर्यंत खाली गेली आहे. त्यामुळे भारताची फुटबॉलची परिस्थिती लक्षात येईल. याआधी भारतीय फुटबॉलमध्ये आधीच अनिश्चितता असताना देशातील अव्वल दर्जाची 'आयएसएल' स्पर्धा स्थगित केल्यामुळे परिस्थिती अधिकच चिंताजनक झाल्याची टिप्पणी राष्ट्रीय संघाचा माजी कर्णधार सुनील छेत्रीने केली होती. मात्र, फुटबॉलच्या या स्थितीला आम्ही जबाबदार नसल्याचा दावा अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचे (एआयएफएफ) अध्यक्ष कल्याण चौबे यांनी केला होता. 'भारतीय फुटबॉलमध्ये सध्या संघषार्चा काळ सुरू आहे. मात्र, या स्थितीला आम्ही जबाबदार नाही',असे त्यांनी म्हटले होते.एकंदरित फुटबॉलची स्थिती सुधारण्याऐवजी,मैदानात सामने होण्याऐवजी मैदानाबाहेरच जास्त संघर्ष दिसला.त्यामुळे गेल्या अनेक वर्षात भारतीय फुटबॉलची स्थिती अजूनच खालवत चालली आहे.

मुळात भारतात फुटबॉल हा खेळ नवा नाही, १८८०-९० च्या दशकात भारतात फुटबॉलने आपले जाळे पसरायला सुरुवात केली. १८८९ साली 'मोहन बागान' या भारतातल्याच नव्हे तर आशियातील सर्वात पहिल्या फुटबॉल क्लबची स्थापना कोलकाता येथे झाली. जिथे फक्त भारतीय खेळाडू खेळत होते. साल १८९१ मध्ये मोहेमेद्दान स्पोर्टींग या क्लबची स्थापना झाली. हे दोन क्लब भारतीय फुटबॉलच्या पुढच्या प्रवासात महत्त्वाचा भाग ठरणार होते. मोहन बागानसारख्या क्लबच्या यशानंतर भारतात मद्रास, दिल्ली, पेशावर, हैदराबाद, बंगळुरू इत्यादी ठिकाणी काही लहान मोठे क्लब्स सुरू झाले. मोहन बागानने १९३३-१९३९ च्या काळात तब्बल २९ विविध स्पर्धांतील चषक जिंकले होते. परंतु, काही काळ सोडला तर भारताला आंतराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आपली छाप उमटवता आली नाही.भारतीय संघाची कामगिरी दिवसेंदिवस खालावत गेली. भारताचे आतापर्यंतचे सर्वोत्तम फिफा रँकिंग ९४ आहे, जे फेब्रुवारी १९९६ मध्ये प्राप्त झाले होते. हाँगकाँगविरुद्धच्या पराभवामुळे २०२७ च्या आशियाई कपसाठी पात्रता मिळवण्याच्या भारताच्या आशांनादेखील धक्का बसला आहे. २०२५ मध्ये, भारताने आतापर्यंत ४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, त्यापैकी १ जिंकला, १ बरोबरी साधली आणि २ पराभव पत्करावा लागला. खराब कामगिरीमुळे, माजी कर्णधार आणि स्टार स्ट्रायकर सुनील छेत्री यांना निवृत्तीनंतर परत बोलावण्यात आले, परंतु संघाचे नशीब बदलले नाही.

ब्रिटिश राजवटीत भारतात फुटबॉलची पायाभरणी झाली आणि तिचा विकास कोलकाता शहरात झाला. आज देशातील लहान-मोठे फुटबॉल क्लब आणि अकादमींच्या संख्येचा विचार केल्यास ती ५० हजारांपेक्षा अधिक आहे. नवीन पिढीतील खेळाडूंत सुनील छेत्री, वायचुंग भुतिया, लालपेखलुआ, गुरप्रीत संधू, संदेश झिंगन, तेलम सिंह, धीरज सिंह, प्रणय हलदर, कुमाम सिंह, आशिक कुरुनिया यांनी आपल्या खेळाच्या कौशल्यावर लोकप्रियता मिळवली. सुनील छेत्रीने तर भारताकडून सर्वाधिक गोल करण्याचा विक्रम केला आहे. भारतात फुटबॉलचा खेळ सुरू होऊन सुमारे १३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला असला तरी जागतिक पातळीवर अजूनही आपण चाचपडत आहोत. भारतातील बहुतांश शहरांत फुटबॉलसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. मुंबईसारख्या शहरात मेस्सीला एका क्रिकेट स्टेडियमवर आमंत्रित केले जाते, यावरूनही परिस्थिती लक्षात येते. भारतात मेहनती आणि फुटबॉलसाठी लागणारे कौशल्य असलेल्या खेळाडूंची कमतरता नाही. परंतु,तसे प्रयत्न त्या त्या राज्यातील सरकारांकडून होणे आता आवश्यक आहे. जिल्हा आणि राज्य पातळीवर अकादमींची स्थापना करणे गरजेचे आहे, जेणेकरून नव्या प्रतिभावन खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल आणि त्यांना योग्य मार्गदर्शन मिळेल. निवृत्त झालेल्या फुटबॉलपटूंची मदतही याकामी घेणे शक्य आहे. फुटबॉलच्या विकासात एक सर्वात मोठे आव्हान म्हणजे प्रशिक्षकांचा अभाव. यावरही लक्ष देणे गरजेचे आहे. आपल्या देशातील सर्व खेळांत पैसा आला असेल, लोकप्रियता वाढली असेल, तरीही खेळ संस्कृतीचा अभाव आहे. यासाठी मैदानांची संख्या पुरेशी असणे अपेक्षित आहे. अनेक शाळांत आणि महाविद्यालयांना मैदाने नाहीत. खेळांसाठी लागणारी प्राथमिक साधने नाहीत. भारतातील मुंबई, पुणे, हैदराबाद, दिल्ली यांसारख्या महत्वाच्या शहरांत आंतरराष्ट्रीय फुटबॉलसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा नाहीत,हे दिसतच आहे.

काही अपवाद सोडले तर ज्या ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये संपूर्ण जगभरातील देश सहभाग घेतात, त्या स्पर्धेमध्ये भारताची कामगिरी अगदीच सुमार आहे. कारण जे खेळ खेळले जातात,त्या खेळांसाठी जशा प्रकारे खेळाडू तयार केले जातात,तीच तयारी आपल्या देशात नाही. किंवा तेवढ्या गांभीर्याने इतर खेळांकडे बघितले जात नाही. शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर खेळणारे खेळाडू पुढे जाऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळताना दिसत नाहीत. फुटबॉल खेळाच्या बाबतीतदेखील तीच स्थिती आहे. अनेक प्रतिभावान खेळाडूंची कमतरता नसतानादेखील बहुतांश खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचू शकत नाहीत. भारतात क्रिकेट स्पर्धांमध्ये आयपीएल सुरू झाल्यानंतर अनेक प्रतिभावान खेळाडू पुढे आले. जे आता भारतीय संघासाठी खेळताना दिसत आहेत.आर्थिक पाठबळ मिळाल्यानेच हे शक्य झाले. फुटबॉलच्या बाबतीतही अशा पाठबळाची आवश्यकता आहे. सरकार आणि अकादमीच्या पातळीवर दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनाला कॉर्पोरेट जगाचे बळ मिळाले तर आगामी काळात प्रतिभावान फुटबॉलपटू निर्माण होण्यास वेळ लागणार नाही.

लिओनल मेस्सी सारखे उत्तम कौशल्य एका दिवसात बनत नाही, त्याला अनेक वर्षांची मेहनत आणि त्या ठिकाणी त्या खेळाला पूरक वातावरणदेखील लागते, तेव्हाच मेस्सी, रोनाल्डो यांच्यासारखे खेळाडू जगप्रसिद्ध होतात. यापुढेदेखील मेस्सीसारखे लोकप्रिय खेळाडू भारतात येतील, त्यांना बघण्यासाठी प्रचंड गर्दी होईल. त्याची प्रसिद्धी होईल,परंतु, देशातून असे अनेक मेस्सी,रोनाल्डो निर्माण होण्यासाठी इथल्या सरकारी यंत्रणांनी व्यापक दृष्टिकोन ठेवून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

# विरोधी पक्षनेते काहे घबराये?

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संपायला अवघे २ दिवस शिल्लक असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे या दोघांची भेट घेतली. या भेटीत उद्धव ठाकरे यांनी दोन्ही सभागृहात तातडीने विरोधी पक्षनेता नियुक्त करावा, या मागणीचे निवेदन दिले. खरे तर या दोन्ही पदांसाठी विरोधकांनी आधीच २ आमदारांच्या नावांची शिफारस केलेली आहे. परंतु, दोन्ही सभागृहाच्या प्रमुखांनी अद्याप यावर कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांपुढे तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत येऊन नुकतेच वर्ष पूर्ण झाले आहे.

मागच्या विधानसभा निवडणुकीत भाजप (१३१), शिवसेना शिंदे गट (५७), राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या (४१) महायुतीला तडाखेबंद यश मिळाले होते. तर शिवसेना ठाकरे गट (२०), काँग्रेस (१६) आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या (१०) यांच्या महाविकास आघाडीची पुरती पिछेहाट झाली होती. मविआतील एकाही घटक पक्षाला विधानसभेच्या एकूण २८८ सदस्यसंख्येपैकी १० टक्के अर्थात २९ आमदारही निवडून आणता आले नाहीत. परिणामी सभागृहातील विरोधकांची ताकद आणखीनच कमकुवत झाली. महायुतीचे सरकार सत्तेत स्थिरस्थावर झाले. विशेष अधिवेशनात विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद सभापतींची निवड झाली. तेव्हापासून आजपर्यंत विधिमंडळाची ३ हून अधिक अधिवेशने झाली आहेत. परंतु या १ वर्षाहून अधिकच्या काळात विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची खुर्ची रिकामीच राहिलेली आहे.

सुरुवातीच्या टप्प्यात विधानसभा सभागृहात विरोधी पक्षनेता कोणत्या पक्षाचा असावा यावर मविआतील घटक पक्षांचे एकमत होत नव्हते. कारण या काळात विधान परिषदेत ठाकरे गटाचे





तत्कालीन आमदार अंबादास दानवे हे विरोधी पक्षनेते होते. छत्रपती संभाजीनगर जालना स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून येणाऱ्या विधान परिषदेच्या जागेवरून अंबादास दानवे ऑगस्ट २०१९ मध्ये विजयी झाले होते. शिवसेनेत झालेल्या पक्ष फुटीनंतर ऑगस्ट २०२२ मध्ये अंबादास दानवे यांच्यावर पक्षाने विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदाची धुरा सोपवली होती. अंबादास दानवे हे शिवसेनेचा आक्रमक चेहरा म्हणून ओळखले जातात. अलीकडच्या काळात ठाकरे गटाची बाजू हिरिरीने आणि आक्रमकपणे मांडणाया नेत्यांमध्ये त्यांचा समावेश होतो. परंतु, ऑगस्ट २०२५ मध्ये अंबादास दानवे यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने ठाकरे गटाच्या हातचे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद गेले.

विधान परिषदेतील एकूण ७८ सदस्यांपैकी सर्वाधिक सदस्य भाजपचे (२२) आहेत. त्यानंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ८ सदस्य आहेत. तर, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे ७ सदस्य आहेत. दानवे विरोधी पक्षनेते असताना शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस या दोघांचे प्रत्येकी ७ सदस्य होते. मात्र, अंबादास दानवे यांचा कार्यकाळ ऑगस्टमध्ये संपल्यानंतर ठाकरेंच्या सदस्यांची संख्या सहावर घसरली. त्यामुळे ७ सदस्य असलेल्या काँग्रेसचे सतेज पाटील यांचे नाव विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदासाठी आणि विधानसभेत ठाकरे गटाच्या भास्कर जाधव यांचे नाव विरोधी पक्षनेते पदासाठी एकमताने निश्चित करण्यात आले. तशा प्रकारची पत्रेही विरोधी पक्षांकडून विधानसभा अध्यक्ष व सभापतींना गेल्या अधिवेशनात सुपूर्द करण्यात आली होती, तरीही हे दोन्ही मान्यवर विरोधी पक्षनेत्यांची नियुक्ती न करता या निवेदनावर मांडी घालून बसले आहेत.

मविआ सरकारच्या काळात विधान परिषदेतील राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या नियुक्ती प्रक्रियेवर जसे तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी मांडी घालून बसले होते अगदी तसेच. विरोधी पक्षनेते पदासाठी १० टक्के आमदारांचे संख्याबळ आवश्यक असल्याचे तकलादू कारण सुरुवातीला सत्ताधार्यांकडून पुढे केले जात होते. त्यावरून विरोधकांवर आजही शेलक्या भाषेत टोमणे मारले जातात. प्रत्यक्षात अशी कुठलीही अट नियम विधिमंडळ अधिनियम आणि कायद्यात नसल्याचा खुलासा विधिमंडळ सचिवांनी याआधीच केलेला आहे. घटनेत किंवा इतर कायद्यात तशी तरतूद असेल तर ती दाखवून द्यावी, असे आव्हानही विरोधकांनी सत्ताधार्यांना दिलेले आहे. परंतु विरोधी पक्षनेता नियुक्त न करण्याचे कुठलेही ठोस कारण ना सत्ताधाऱ्यांना ना ॲड. राहुल नार्वेकर व प्रा. राम शिंदे यांना देता आले. या प्रश्नावरून विरोधकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सभागृहातच घेरले होते. तेव्हा विरोधी पक्षनेता निवडीचे अधिकार विधानसभा अध्यक्ष आणि सभापतींकडे असल्याचे म्हणत त्यांनी हात झटकले होते. मात्र, हे दोघेही जण कुणाच्या इशाऱ्यावरून या नियुक्तीला टाळाटाळ करत आहेत, हे न समजण्याइतके विरोधक दुधखुळे नाहीत.

विरोधी पक्षनेता हे घटनात्मक आणि संविधानिक पद आहे. त्याला घटनात्मक दर्जा आहे. विरोधी पक्षनेत्याला कॅबिनेट मंत्र्याप्रमाणेच दर्जा असतो. तो प्रशासनाशी, अधिकार्यांशी अधिकाराने बोलू शकतो, त्यांना प्रश्न विचारू शकतो. त्यांच्याकडून माहिती घेऊ शकतो, या माहितीच्या आधारे सरकारला जाब विचारू शकतो. सत्ताधारी चुकीचे निर्णय घेत असल्यास त्यांच्यावर आसूड ओढू शकतो. त्यांनाही प्रश्न विचारून नियमाने वागण्यास भाग पाडू शकतो. जनतेचे प्रश्न सभागृहात मांडण्याचे, विरोधी बाकांवरील सदस्यांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहण्याचे व त्यांचा आवाज बुलंद करण्याचे काम विरोधी पक्षनेता करत असतो. परंतु, दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता नसल्यामुळे विरोधी बाकांवरील सदस्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून केला जात आहे.

एकीकडे केंद्रात वंदे मातरम् गीतावरून लोकशाहीच्या आणाभाका घेतल्या जात असताना, राज्यातील भाजपप्रणित महायुती सरकारने विधानसभा आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेत्याची निवड करून लोकशाहीचा मान राखण्याची गरज आहे. खरे तर महायुतीचे सरकार इतक्या प्रचंड बहुमताने सत्तेत बसलेले आहे. मग या सरकारला एका विरोधी पक्षनेत्याची भीती का वाटावी? विरोधकांसोबतच जनतेनेही आता सत्ताधार्यांना काहे घबराये, असा प्रश्न विचारायला हरकत नाही.


# 'प्रभु जवळी असता'

परमात्म्याचे लक्षण निश्चित झाल्यानंतर प्रश्न येतो, 'ईश्वर चेतन आहे की नाही?' विद्यारण्य मुनी पंचदशीत म्हणतात, 'जिह्वा मेऽस्ति न वेत्युक्ति र्लज्जायै केवलं यथा। न बुध्यते मया बोधो बोद्धव्य इति तादृशी।।' माझी जीभ आहे किंवा नाही, असे म्हणणे लज्जास्पद असते. असे म्हणणाऱ्याला मूर्ख समजले जाते; कारण जिभेशिवाय तो बोलू शकणार नाही. तद्वतच, जो बोध मी आजपर्यंत जाणू शकलो नाही, तो मला आत्ताच समजून घ्यायचा आहे, असे सांगणेही लज्जास्पद आहे; कारण बोधाशिवाय ही गोष्ट सांगणे अशक्य आहे. याला शास्त्रामध्ये 'व्याहती दोष' (आपल्या म्हणण्याचे आपणच खंडन करणे) असे म्हणतात. चैतन्य हे परमात्म्याचे लक्षण आहे असे निश्चित झाले, तर नास्तिक वैज्ञानिक, एखादा पुस्तकी पंडित किंवा इतर कोणीही परमात्म्याच्या अस्तित्वाचे खंडन करू शकणार नाही. एकदा परमात्म्याचे स्वरूप जाणले, की त्याचे पुरावे प्रत्येक क्षणी उपस्थित असतात. आपले समस्त जीवन म्हणजे अनुभवांचे गाठोडे आहे. हे अनुभव आपल्याला जन्मापासून येतात आणि ते चैतन्यामुळेच येतात. श्रीमार्तंड माणिकप्रभू एका पदात प्रभूचे वर्णन करताना म्हणतात, 'पूर्णकृपें कृपा बोलवेना, अनुभवे अनुभवही साहीना।' ते अनुभव सांगता येत नाहीत; कारण प्रभू हाच अनुभव आहे. प्रभू हाच ज्ञानस्वरूप आहे. तेच चैतन्य आहे. हे अनुभव जीवास क्षणोक्षणी येत राहतात. झोपेतही चाललेला श्वासोच्छ्वास, हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. श्रीमद्भगवद्गीतेच्या पंधराव्या अध्यायातील चौदाव्या श्लोकातही म्हटले आहे, 'अहं वैश्वानरो भूत्वा प्राणीनां देहमाश्रितः। प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्।।' अर्थात - सर्व प्राणिमात्रांच्या देहातील जठराग्नी मी आहे.

# तवा राईस

**सामग्री :** २ वाटी शिजवलेला भात, २ अख्ख्या लाल मिरच्या, १ चमचा आले-लसूण पेस्ट, फोडणीसाठी तेल, बारीक चिरलेला एक कांदा, गाजर, टोमॅटो (इच्छेप्रमाणे), अर्धा वाटी मटार, १/२ चमचा पाव भाजी मसाला, १/४ चमचा हळद पावडर, १/२ चमचा तिखट, मीठ स्वादानुसार.

**कृती :** सर्वात आधी गाजर आणि मटार उकळून घ्यावे जेणेकरून नरम होतील. एक मोठ्या पॅनमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, अख्ख्या लाल मिरच्या आणि पाव भाजी मसाला टाका. नंतर कांदा, आले-लसूण पेस्ट टाकून मिक्स करा. नंतर टोमॅटो टाकून हलवून घ्या. शिजल्यासारखं वाटल्यावर त्यात मटार आणि गाजर टाका. नंतर हळद, तिखट, गरम मसाला, मीठ टाका. आता भात टाकून हलक्या हाताने हलवून घ्या. वरून कोथिंबीर, लिंबाने सजवून घ्या. दह्यासोबत सर्व्ह करा.



# केमिकल पिलिंग केल्यानंतर कशी घ्याल चेहऱ्याची काळजी ?



**चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी, चेहरा उजळावा याकरिता केमिकल पिल्स फायदेशीर ठरतात. केमिकल पिल्समुळे त्वचेवरील निस्तेज आणि मृत स्तर काढायला मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार होते. चेहऱ्यावर लावले जाणारे केमिकल त्वचेतील टिश्यूंचे नुकसान टाळण्यास मदत करतात. केमिकल पिलमध्ये ॲसिड, फळांचा, बोटॅनिकल एक्सट्रॅक्ट किंवा दुधाचा समावेश असतो. त्वचेच्या पोतनुसार आणि समस्येनुसार कोणते पिल वापरावे याचा निर्णय डॉक्टर घेतात. केवळ केमिकल पिल लावून तुम्हाला अपेक्षित निकाल मिळत नाहीत, तर त्यानंतरही त्वचेची काळजी घेणं आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध सेलिब्रिटी डरमॅटोलॉजिस्ट डॉ. जयश्री शरद यांनी दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.**



▮ पिल लावल्यानंतर लगेचच आईस कॉम्प्रेसेस चेहऱ्यावर फिरवावे. किमान १०-१५ मिनिटे आईस कॉम्प्रेस चेहऱ्यावर ठेवा.

▮ केमिकल पिलनंतर किमान १० दिवस चेहऱ्याला स्क्रब किंवा गरम पाणी लागणार नाही याची काळजी घ्या. या दिवसांत चेहऱ्याला स्क्रब आणि गरम पाणी वापरू नका.

▮ सौम्य, न्यूट्रल pH फेशिअल क्लिंजरचा वापर करा. चेहरा स्वच्छ करण्यासाठी sebamed olive wash dla वा Cetaphil cleansing lotion चा वापर करावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंट केल्यानंतर लगेचच तसेच सनस्क्रीन न लावता बाहेर पडू नका. उन्हात फिरत असल्यास किमान दोन-दोन तासांनी सतत सनस्क्रीन लावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंटनंतर दोन दिवसांनी चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावायला सुरुवात करा.

▮ केमिकल पिलनंतर काही तासांतच त्वचेवरून एक पातळ स्तर निघायला सुरुवात होते. तो स्तर काढण्यासाठी सतत चेहऱ्याला हात लावू नका किंवा त्वचा खेचू नका.

▮ स्कीन पिलिंग होताना ब्लिचिंग किंवा केस काढण्यासाठी थ्रेडिंग, वॅक्सिंग करणे टाळा.

▮ पिलिंग होताना ॲण्टी ॲक्ने क्रीमचा वापर करू नका. तसेच स्क्रीन लाईटिंग क्रीम वापरणे टाळा.

# वारंवार तोंड येत असल्यास आजमावा हे उपाय

**पचनक्रिया** व्यवस्थित नसेल, किंवा शरीरामध्ये काही कारणाने उष्णता वाढली असेल, तर वारंवार तोंड येऊ लागते. यालाच 'माऊथ अल्सर्स' असेही म्हटले जाते. अनेकदा काही कारणासाठी घेतलेली औषधे उष्ण पडल्यानेही तोंड येऊ शकते. तोंड आले असता काही खाणे-पिणे कठीण होऊन बसते. जिभेवर बारीक फोड येतात आणि क्वचित वेदनाही होतात. बहुतेक वेळी बी कॉम्प्लेक्स घेतल्याने माऊथ अल्सर्स थोड्याच अवधीत बरे होतात. त्याच्या जोडीने काही घरगुती उपायांचा अवलंब करूनही हे माऊथ अल्सर्स बरे करता येऊ शकतात.

तुळस स्वास्थ्यवर्धक असून, यामध्ये वेदनाशमक गुण आहेत. तसेच शरीरातील उष्णता कमी करण्यासही तुळस सहाय्यक आहे. तोंड आले असता दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीची पाने चावून खाल्ल्याने आराम मिळतो. जर पचनक्रिया सुरळीत नसल्याने शरीरातील उष्णता वाढून तोंड आले असले, तर ते बरे करण्यासाठी खसखस उपयुक्त ठरते. थोडी खसखस चावून खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन तोंडातील अल्सर्स लवकर निवळतात.

नारळाचे तेल आणि नारळाचे पाणी हे दोन्ही तोंडातील अल्सर ठीक करण्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. नारळाच्या पाण्याने शरीरातील उष्णता दूर होत असून, नारळाचे तेल तोंडात धरून चूळ भरल्याप्रमाणे खुळखुळविल्यानेही तोंडातील अल्सर ठीक होण्यास मदत होते. याला 'ऑईल पुलिंग' म्हटले जाते. जिथे अल्सर आहेत त्यावरून नारळाचा चव लावल्यानेही तोंडातील अल्सर बरे होतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ मधाच्या पुडीमध्ये थोडासा मध घालून तोंडामध्ये आणि जिभेवर लावल्यास अल्सर ठीक होतात.



# फुफ्फुसाचा कर्करोग टाळण्यासाठी योग उपयुक्त



**फुफ्फुसाचा** कर्करोग हा जगामध्ये सर्वात जास्त आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. केवळ २०१८ या एकाच वर्षामध्ये जगभरामध्ये २,०९३,००० रुग्णांना फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचे निश्चित निदान केले गेले. वास्तविक हा रोग महिलांच्या मानाने पुरुषांमध्ये अधिक आढळून येत असे. पण सध्याच्या काळामध्ये वाढते प्रदूषण, बदललेल्या जीवनशैली यामुळे हा रोग आता महिलांमध्येही आढळून येऊ लागला आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगाचे चार प्रकार असून, यामध्ये 'अडेनोकार्सीनोमा' आणि 'स्क्वामस सेल कार्सीनोमा' हे दोन प्रकार जास्त आढळून येणारे आहेत. सध्याच्या प्रगत काळामध्ये फुफ्फुसाचा कर्करोग योग्य उपचार करून बरा होण्यातला असला, तरी मुळात या कर्करोगाचे निदान वेळेवर होणे अत्यावश्यक असते. या रोगाची अनेक लक्षणे असून, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत खोकला येणे, हात आणि बगलांमध्ये वेदना, मान आणि पाठदुखी, दम लागणे, अचानक वजन जलद घटू लागणे, थुंकीतून रक्त पडणे आणि सतत सुस्ती जाणवणे ही या रोगाची काही प्रमुख लक्षणे आहेत. या रोगावर निश्चित उपचार शोधीत असतानाच, सामन्य 'ॲलोपथीक' उपचार पद्धतीच्या जोडीनेच वैद्यकीय तज्ज्ञ इतर उपचार पद्धतींकडेही पाहत आहेत. या पद्धतींमध्येच योगसाधना फुफ्फुसाच्या कर्करोगावर अतिशय प्रभावी उपाय असल्याचे दिसून आले आहे. या संबंधी रिसर्च अमेरिकेमध्ये सुरू असून, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ येथील २६ रुग्णांवर केमोथेरपी आणि इतर उपचारांच्या सोबतच योगसाधनेद्वारेही यशस्वी उपचार करण्यात येत आहेत. या सर्व रुग्णांवर योगसाधनेचा प्रभाव इतका चांगला झाला, की कर्करोगातून पूर्ण बरे झाल्यानंतरही आता यातील अनेक रुग्णांनी योगसाधनेचा अवलंब त्यांच्या जीवनशैलीमध्ये कायमस्वरूपी केला असल्याचे समजते. योगसाधनेमुळे शरीर तणावरहित होत असून, जे रुग्ण केमोथेरपी किंवा रेडिएशन थेरपीसारखे उपचार घेत होते, त्यांच्यासाठी योगसाधना विशेष फायद्याची ठरली आहे. तसेच या रुग्णांच्या वैयक्तिक शारीरिक क्षमता आणि आवश्यकता लक्षात घेऊन त्यानुसार योगासने त्यांना शिकविली गेल्याने त्याचा या रुग्णांना विशेष लाभ झाल्याचे पहावयास मिळत आहे.

# व्यवस्थित काम करत असलेला स्मार्टफोन तुमच्या 'या' सवयींमुळे होतो खराब

**अनेक वेळा स्मार्टफोन योग्य काळजी न घेतल्यामुळे देखील अचानक खराब होतो आणि फोनवर केलेला खर्च व्यर्थ झाल्यासारखा वाटतो. पण, स्मार्टफोन नीट हाताळला आणि वापरताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली तर फोन खराब झाल्यामुळे होणारे नुकसान टाळता येऊ शकते. तुम्हीही या चुका करत असाल तर लगेच या सवयी बदला, अन्यथा तुमचा स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. पाहा या काही सोप्या टिप्स.**



### चार्ज करताना लक्ष ठेवा

स्मार्टफोन चार्ज करताना खूप काळजी घ्यावी लागते. अनेकदा युजर्स फोन चार्जवर ठेवतात आणि त्याबद्दल विसरून जातात. यामुळे स्मार्टफोनचा मदरबोर्डही खराब होऊ शकतो. फोनचा मदरबोर्ड खराब झाल्यास तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागेल. यामुळे फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोन एकदा खराब झाल्यास, त्यानंतर तुम्हाला नवीनच फोन घ्यावा लागेल. कारण फोनच्या मदर बोर्डची किंमत खूप जास्त आहे.

### पाण्यापासून दूर ठेवा

पावसाळ्यात अनेकदा स्मार्टफोन खराब होतात. कारण, ते मदर बोर्डमध्ये हलका ओलावा आणतात. अशा परिस्थितीत फोनचा मदरबोर्ड कायमचा डेड होऊ शकतो. काही वेळा फोन पाण्याजवळ ठेवल्यास देखील मदर बोर्डमध्ये ओलावा येतो. मदर बोर्डमध्ये ओलावा असल्यास, फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोनचा मदर बोर्ड खराब झाला असेल तर त्यानंतर फोनचा काहीही उपयोग होणार नाही.

### वारंवार चार्जिंग करणेसुद्धा नाही सुरक्षित

स्मार्टफोनचे वारंवार चार्जिंग करणे देखील टाळावे. जर तुम्ही स्मार्टफोनला वारंवार चार्ज करत असाल तर फोनच्या प्रोसेसरवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामुळे स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. तसेच त्याचा सर्वात मोठा तोटा म्हणजे फोनची बॅटरी कायमची डेड होऊ शकते. अशा परिस्थितीत तुम्हाला फोनची बॅटरी आणि मदर बोर्ड दोन्ही बदलावे लागू शकतात. म्हणजेच चांगली मोठी रक्कम स्मार्टफोन रिपेयरसाठी खर्च करावी लागू शकते.

# त्वचेच्या संसर्गापासून मुक्ती मिळवण्यासाठी घरगुती उटणे



**साहित्य :**

एक वाटी मसूर डाळीचे पीठ, कच्चे तांदूळ एक चतुर्थांश कप, आठ बदाम, अर्धा कप गव्हाचा सांजा, चिमूटभर हळद, गुलाबपाणी

**कृती व वापरण्याची पद्धत**

▮ मसूर डाळ, तांदूळ आणि बदाम बारीक वाटून त्याची पूड तयार करा. ▮ या पावडरमध्ये गव्हाची भरड आणि हळद घाला. ▮ या मिश्रणात पाणी किंवा गुलाबपाणी घालून पेस्ट बनवा. ▮ ही पेस्ट चेहरा, मान आणि हातावर लावा. ▮ वाळल्यावर पाण्याने धुऊन घ्या. ▮ आठवड्यातून एकदा या उटण्याचा वापर करावा.

**हे कसे कार्य करते?**

त्वचेच्या सौंदर्यवर्धनासाठी प्राचीन काळापासून उटण्यांचा वापर केला जात आहे. हे त्वचेवरील घाण दूर करण्यास मदत करतं. हळदीत आढळणाऱ्या ॲंटिसेप्टिक गुणधर्मामुळे त्वचेचं संसर्गापासून संरक्षण होतं. बदाम त्वचेचं पोषण करून रंग उजळण्यास मदत करतो.

# ...तर तुमचा टॉवेल बनू शकतो तुमच्या त्वचेचा शत्रू

**अंघोळ केल्यानंतर मिळणारा फ्रेशनेस कशातच नाही. दिवसातून किमान एकदा तरी आपण अंघोळ करतो. अंघोळ केल्यानंतर अंग पुसण्यासाठी आपण टॉवेलचा उपयोग करतो. तुम्ही वापरत असलेला टॉवेल तुमचे शरीर पुसण्याचे काम करतो, पण याशिवाय तुमच्या शरीरावरील मळ काढण्यासही मदत करतो. पण जर तुम्ही तुमच्या टॉवेलची योग्य काळजी घेतली नाही तर मात्र हाच टॉवेल तुमच्या त्वचेचा शत्रू बनू शकतो. आज आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक माहिती देणार आहोत. त्यामुळे तुम्हीही टॉवेल कसाही वापरत असाल तर हे नक्की वाचा.**

### टॉवेलची स्वच्छता

काही जणांना टॉवेल सतत धुण्याची गरज नसते, असे वाटते. तुम्ही असा विचार करत असाल तर तो अगदीच चुकीचा आहे. कारण तुम्ही अंघोळ केल्यानंतर तुमच्या शरीरावर साचलेला मळ काढला जातो. त्यामुळे साहजिकच तुमचा मळ टॉवेलवर साचतो. अशावेळी जर तुम्ही हा टॉवेल सतत वापरत राहिलात तर तुमच्या त्वचेवरही मळ साचत राहील. त्यामुळे तुम्हाला स्वच्छ करणाऱ्या टॉवेलची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा टॉवेल धुणे अपेक्षित असते. जर तुमचा टॉवेल पातळ असेल तर तुम्ही तो रोज धुतला तर फारच उत्तम.

### आता आली फेकून देण्याची वेळ

टॉवेल कितीही चांगला वाटत असला तरी त्याला वापरण्याचीही काहीतरी मर्यादा आहे. तुम्ही वर्षानुवर्षे एकच टॉवेल वापरू शकत नाही. तुम्हाला कालांतराने टॉवेल फेकण्याचीही गरज असते. तुम्ही कॉटन किंवा टर्किश कोणताही टॉवेल वापरत असाल तरीदेखील तुम्ही हा टॉवेल सहा महिन्यांनी काढून टाकायला हवा. जास्तीत जास्त सहा महिने आणि कमीत कमी ३ महिने तुम्ही टॉवेल वापरायला हवा.



### टर्किश की कॉटन टॉवेल

तुमची त्वचा ही फारच नाजूक असते. कोणतेही कॉस्मेटिक वापरताना तुम्ही अगदी पारखून सगळ्या गोष्टी तपासता. पण मग टॉवेलबाबतीत का नाही? तुम्हाला लवकर वाळणारा टॉवेल हवा असेल तर तुम्ही पंचा किंवा पातळ टॉवेलची निवड करा. जर तुम्हाला मऊ असा टॉवेल हवा असेल तर तुम्ही टर्किश टॉवेलचा वापर करा. आता तुमच्या आवडीवर टॉवेलची निवड अवलंबून आहे.

### सूर्यप्रकाश महत्त्वाचा

अनेकांना टॉवेल वाळत घालण्याचा कंटाळा असतो. पण तुमच्या टॉवेलसाठी सूर्यप्रकाश महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही तुमचा टॉवेल सूर्यप्रकाशात वाळत घालायला हवा. कारण जर त्या टॉवेलवर काही जंतू असतील आणि तुम्हाला टॉवेल धुणे शक्य नसेल अशावेळी कडकडीत उन्हात टॉवेल ठेवल्यामुळे त्यावरील जीवाणू कमी होतात.



### एकट्याने वापरण्याची गरज

शेअरिंग-केअरिंगमध्ये तुम्ही एकाच टॉवेलचा दोन ते तीन जण वापर करत असाल तर ते तुमच्या त्वचेसाठी फारच वाईट आहे. कारण दोन ते तीन जणांनी एकच टॉवेल वापरला तर तुम्हाला संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही कधीही एकच टॉवेल दोन ते तीन जणांमध्ये वापरू नका. तुम्हाला त्वचा विकार जडण्याची शक्यता यामध्ये अधिक असते. आता तुम्हाला टॉवेल हा अंघोळीपुरता वाटत असला तरी त्याचे महत्त्व काय ते नक्कीच कळलं असेल, त्यामुळे यापुढे याची अधिक खबरदारी घ्या.

# जास्त मीठ खाल्ल्याने होऊ शकतो मधुमेह



**मधुमेहापासून** स्वतःला दूर ठेवायचे असेल तर केवळ साखर खाणे सोडून चालणार नाही. कारण, नुकत्याच करण्यात आलेल्या एका नव्या संशोधनानुसार जास्त मीठ खाणेही बनू शकते मधुमेहाचे कारण. संशोधकांच्या मते जास्त मीठ म्हणजे सोडियम खाल्ल्याने उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते.

मात्र, आता नव्या संशोधनामुळे जास्त मीठ खाणे हे कारण मधुमेह हा आजार होण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते. लिस्बनमध्ये आयोजित युरोप असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ डायबेटिसच्या वार्षिक बैठकीत यासंबंधी माहिती देण्यात आली.

जे लोक दिवसभरात २.५ ग्रॅमपेक्षाही जास्त मीठ खातात, त्यांना टाइप २ डायबेटिसचा धोका ४३ टक्क्यांहून अधिक असतो. तसेच शरीराच्या आवश्यकतेपेक्षा ७.३ ग्रॅम जास्त मीठ खात असाल, तर टाइप २ डायबेटिसचा धोका वाढून तो ७२ टक्क्यांवर पोहोचतो.

# शरीरासाठी अतिशय घातक आहे साबुदाणा;

## उपवास, व्रत-वैकल्यांसाठी वापरण्याआधी जाणून घ्या गुणधर्म



**हिंदू** धर्मासह इतरही धर्मांत अनेक सण-उत्सव, व्रत-वैकल्ये केली जातात, उपवास ठेवले जातात. यामध्ये एक समान गोष्ट असते ती म्हणजे उपवासाचे पदार्थ. उपवासादरम्यान जवळजवळ सर्व घरांत हमखास वापरण्यात येणारा पदार्थ म्हणजे साबुदाणा. तसाही साबुदाणा पूर्ण वर्षात विविध कारणांनी वापरला जातो, अनेक ठिकाणी साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडे हे नाश्त्याचे पदार्थ म्हणून त्याला पसंती दिली जाते. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारा साबुदाणा आपल्या शरीरासाठी लाभदायक आहे का, याचा कधी विचार केला आहे?

**साबुदाणा शरीरासाठी आहे अतिशय घातक, तुम्हीच पाहा कारणे -**

▮ साबुदाण्याचा जन्म हा इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स या देशांत झाला. साबुदाणा हा सागो झाडांपासून कृत्रिमरीत्या तयार केला जातो. यामध्ये कर्बोदकांचे प्रमाण अतिशय जास्त आहे, त्यामुळे वजन वाढण्यासाठी हा कारणीभूत ठरू शकतो.

▮ १०० ग्रॅम साबुदाण्यामध्ये मध्ये ९४ ग्रॅम कर्बोदके, ०.२ ग्रॅम प्रथिने, ०.५ ग्रॅम तंतुमय घटक व फक्त १० ग्रॅम कॅल्शिअम असते. यावरून लक्षात येते की शरीरासाठी (वजन वाढवण्याखेरीज) तसा या पदार्थाचा काहीच उपयोग नाही.

▮ साबुदाण्यापासून पदार्थ बनवण्यासाठी त्यात जे पदार्थ वापरले जातात, त्यामध्ये बटाटा, शेंगदाणे कुट व इतर काही घटकांचा समावेश असतो. हे घटक पचायला अतिशय जड असतात यामुळे पित्त वाढणे, पोट फुगणे, पोट दुखणे, भूक मंदावणे अशा समस्या उद्भवतात.

▮ साबुदाणा आतड्यातील सर्व द्राव शोषून घेत असल्याने आपली मलप्रवृती सुद्धा कठीण होते. तसेच साबुदाण्यामुळे पित्ताचा त्रासही वाढतो.

अशाप्रकारे ज्या दिवशी हलका आणि प्रमाणात आहार घ्यायचा त्याच दिवशी, म्हणजे उपवासाच्या दिवशी आपण साबुदाण्यासारखा जड पदार्थ खाऊन स्वतःच्या शरीराचे नुकसान करून घेत आहोत. त्यामुळे वेळीच सावध व्हा व साबुदाण्याचा जितका हवा तितकाच वापर करा.

**आयुर्वेदानुसार मनुकांमध्ये भरपूर मात्रेत औषधी गुण असतात. आम्हाला रोज ४-५ मनुका खायलाच पाहिजे. मनुकांना सर्दी-खोकला आणि कफ दूर करण्याचे सर्वात उत्तम औषध मानले जाते. त्याशिवाय देखील मनुकांचे बरेच फायदे असतात. त्यात उपस्थित न्यूट्रिएंट्स बऱ्याच आजारांमध्ये फायदेशीर ठरतात. तर जाणून घेऊ रोज मनुका खाण्याचे काय फायदे आहेत...**

# रोज करा ५ मनुकांचे सेवन आणि बघा त्याचे फायदे

▮ मनुका खाल्ल्याने ब्लड सर्क्युलेशन इम्प्रुव्ह होते. यामुळे त्वचेची रंगत वाढते आणि रंग देखील निखरण्यास मदत होते.

▮ मनुकांमध्ये फायबर्स असतात. हे डायजेशन योग्य ठेवण्यास मदत करतात.

▮ यात पोटॅशियमची मात्रा जास्त असते. मनुका हार्ट अॅटॅकच्या आजारांमध्ये इफेक्टिव्ह आहे.

▮ यात आयर्न असतं. हे ॲनिमिया (रक्ताची कमतरता) दूर करण्यास फायदेशीर ठरतात.

▮ यात ॲंटीऑक्सिडेंट्स असतात. यामुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून बचाव होण्यास मदत मिळते.

▮ यात ॲंटीबॅक्टेरियल गुण असतात. यामुळे सर्दी-खोकला ठीक होण्यास मदत मिळते.

▮ यात बीटा कॅरोटिन असते, जे डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतं.

▮ यात ऑक्झेलिक ॲसिड असतं. यामुळे दात मजबूत होतात. यामुळे गम प्रॉब्लेमपासून बचाव होतो.

▮ यात कॅल्शियमची मात्रा अधिक असते. म्हणून जॉइंट पेनपासून बचाव होतो.

▮ याचे सेवन केल्याने बॉडीचे टॉक्सिन्स दूर होऊन हेअर फॉलची समस्या देखील दूर होते.



**मनुका खाण्याचे हेल्दी मार्ग**

▮ कब्ज दूर करण्यासाठी रात्री पाच मनुका आणि एक लसणाची कळी खायला पाहिजे.

▮ मनुकांत मध मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

▮ याला दुधात उकळून त्याचे सेवने केल्याने देखील फायदा होतो.

▮ मनुकांमध्ये बडिशेप आणि ओवा मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

## पालिका निवडणुकीला विलंब का झाला?

राज्यातील नागरी निवडणुकांना विलंब होण्याचे मुख्य कारण ओबीसी आरक्षणाचा मुद्दा आणि मुंबईतील प्रभागांची पुनर्रचना हे आहे. २१ जुलै २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक निवडणुकांमध्ये २७% ओबीसी आरक्षणाला परवानगी दिली, परंतु राज्य निवडणूक आयोगाने पालिकेसह ३६७ स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुका पुन्हा अधिसूचित करू नयेत, असे आदेश दिले. यानंतर, राज्य निवडणूक आयोगाने पालिका प्रभागांचे पुनर्वर्गीकरण केले, ज्यात १५६ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी, १५ जागा अनुसूचित जातीसाठी, २ जागा अनुसूचित जमातीसाठी आणि ६३ जागा ओबीसींसाठी निश्चित केल्या, ज्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने ताकीद दिली. याव्यतिरिक्त, पालिका प्रभागांची पुनर्रचना २२७ वरून २३६ जागा वाढवण्याच्या निर्णयानंतर करण्यात आली होती, ज्याला ऑगस्ट २०२२ मध्ये तत्कालिन शिंदे सरकारने थांबवले. मुंबई न्यायालयाने एप्रिल २०२३ मध्ये हा निर्णय कायम ठेवला आणि यावर पुढील आव्हाने सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. निवडणुका घेण्यास विलंब होण्यामागे अनेक कारणे होती. वार्ड सीमानिर्धारणाचे आव्हान आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी जागांच्या आरक्षणाबाबतची चिंता हा एक प्रमुख मुद्दा होता. याव्यतिरिक्त, प्रभागांची संख्या आणि प्रत्येक प्रभागातील नगरसेवकांच्या संख्येबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या कायदेशीर प्रकरणांमुळे ही प्रक्रिया थांबली होती. आगामी निवडणुकीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील निवडणूक प्रभागांची संख्या २२७ निश्चित करण्यात आली आहे.

# मुंबई पालिकेत कोणत्या सेनेचे वर्चस्व?

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

गेल्या चार निवडणुकांमध्ये म्हणजेच २०१७, २०१२, २००७ आणि २००२ मध्ये इतर कोणत्याही पक्षासोबत युती असली तरीही अविभाजित शिवसेनेने सर्वाधिक जागा जिंकल्या होत्या. २०१७ मध्ये, अविभाजित शिवसेनेने ८४ जागा जिंकून वर्चस्व गाजवले होते, तर २०१२ च्या निवडणुकीत ती ७५ जागांसह सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आली होती. त्यावेळी काँग्रेसने ५२ जागांसह दुसरा क्रमांक पटकावला होता, भाजपने ३१ जागा जिंकल्या होत्या आणि मनसेने २८ जागांवर विजय मिळवला होता.

२००७ मध्ये, शिवसेनेने ८४ जागा जिंकल्या आणि भाजपने २८ जागा मिळवल्या, तर काँग्रेसनेही ७५ जागा मिळवून चांगली कामगिरी केली होती. २००२ च्या निवडणुकीत युतीला स्पष्ट बहुमत मिळाले होते, ज्यात शिवसेनेने ९७ जागा आणि भाजपने ३५ जागा जिंकल्या होत्या, तर काँग्रेसने ६१ जागांवर विजय मिळवला होता. तथापि, यावेळी परिस्थिती वेगळी आहे. शिवसेना आता उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील दोन गटांमध्ये विभागली गेली आहे आणि कोणता गट वरचढ ठरतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल, ज्यामुळे मुंबई महानगरपालिकेची निवडणूक पूर्वीपेक्षा अधिक स्पर्धात्मक आणि अनपेक्षित झाली आहे. २०१७ च्या बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना ८४ जागा जिंकून विजयी झाली आणि महानगरपालिकेवरील आपले नियंत्रण कायम ठेवले. तथापि, २०२२ मध्ये पक्षात फूट पडल्यानंतर एक महत्त्वपूर्ण बदल घडला. अनेक निवडून आलेले नगरसेवक, विशेषतः शिवसेनेच्या पूर्वीच्या गटातील, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना गटात सामील झाले, ज्यामुळे मुंबईतील राजकीय निष्ठांमध्ये फेरबदल झाला.

### मुंबईची निवडणूक चर्चेत का आहे?

भारताची आर्थिक राजधानी आणि देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असल्याने मुंबईची महानगरपालिका निवडणूक राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जाते. मुंबई महानगरपालिका ही आशियातील सर्वात श्रीमंत नागरी संस्था म्हणून ओळखली जाते. ती शहराची प्रचंड अर्थव्यवस्था आणि पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन करते आणि तिचे वार्षिक बजेट हे अनेक भारतीय राज्यांपेक्षा अधिक आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मुंबई पालिकेने आतापर्यंतचा आपला सर्वात मोठा - ७४,४१५ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला होता. २७ हजार कोटी रुपये. ही रक्कम बंगळुरूच्या महानगरपालिकेच्या २०२५-२६ या वर्षासाठीच्या १९,९३० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पापेक्षा चौपट जास्त असल्याचे सांगितले जात आहे. महानगरपालिकेचे २०२५-२६ या वर्षासाठीचे ७४,४२७ कोटी रुपयांच्या बजेटपैकी ४३,१६२ कोटी रुपये विकास प्रकल्पांसाठी वाटप करण्यात आले आहेत. हे बजेट वाटप या निवडणुकांचे महत्त्व अधोरेखित करते. सत्तेवर असलेला राजकीय पक्ष शहराच्या पायाभूत सुविधा आणि शहरी विकासावर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकेल.

### २०२२ पासून पालिका निवडणुका का नाही?

राज्य निवडणूक आयोगाने पालिका निवडणुकांच्या तारखा सोमवारी जाहीर केल्या. यामुळे २१ फेब्रुवारी २०१७ रोजी झालेल्या शेवटच्या निवडणुकांनंतरच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींविना असलेल्या प्रशासनाचा कालावधी लवकरच संपेल. यापूर्वीच्या निवडणुका २१ फेब्रुवारी २०१७ रोजी झाल्या होत्या. निवडून आलेल्या मंडळाचा कार्यकाळ मार्च २०२२ मध्ये संपला. परंतु त्यावेळी निवडणुका झाल्या नाहीत. परिणामी, पालिका निवडून आलेल्या नगरसेवकांऐवजी प्रशासकाने नियुक्त केलेल्या संरचनेंतर्गत कार्यरत आहे. २०१७ मध्ये २१ फेब्रुवारी रोजी एकाच टप्प्यात निवडणुका झाल्या होत्या, तर निकाल २३ फेब्रुवारी रोजी जाहीर झाले होते. २०१७ नंतर पालिकेत महापौरपद शिवसेनेकडे राहिले.

### पालिकेचे सध्याचे कामकाज कसे चालत आहे?

दरम्यानच्या काळात, महानगरपालिका आयुक्तांनी सामान्यतः निवडून आलेल्या मंडळाकडे असलेल्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत. महापौर आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली चालणारी महापालिका प्रशासकीय राजवटीखाली कार्यरत आहे. काही निरीक्षकांनी रहिवाशांसाठी निवडून आलेल्या प्रतिनिधींचा आवाज नसण्याबद्दल आणि त्याचा स्थानिक उत्तरदायित्व आणि प्रतिनिधित्वावर होणाऱ्या परिणामाबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

### २०१७ मध्ये स्थिती कशी होती?

यापूर्वीच्या - २०१७ च्या पालिका निवडणुकीत एकूण २२७ जागांपैकी अविभाजित शिवसेनेने ८४ जागा जिंकल्या होत्या, तर भाजपने ८२ जागा जिंकल्या. त्यावेळी हे दोन्ही पक्ष युतीमध्ये होते. काँग्रेसने ३१ जागा जिंकल्या होत्या तर संयुक्त राष्ट्रवादी काँग्रेसला १३ जागा मिळाल्या होत्या. राज ठाकरे यांच्या मनसेने ७ जागांवर विजय मिळवला होता.



# निवडणुकीसाठी अंतिम प्रारूप मतदार यादी जाहीर

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई महापालिकेसाठी निवडणूक विभागाने २५ नोव्हेंबर रोजी जाहीर केलेल्या प्रारूप मतदार यादीवरील हरकती आणि सूचना यांची दखल घेण्यात आली आहे. त्यानुसार मंगळवारी (१६ डिसेंबर) महापालिकेने सुधारित व अंतिम, सुधारित प्रारूप मतदार यादी, वार्ड निहाय मतदारांची संख्या जाहीर केली आहे. त्यानुसार एल वॉर्डमधील प्रभाग क्रमांक १६४ मध्ये सर्वाधिक, तर एस वॉर्डमध्ये सर्वात कमी मतदार संख्या दाखवण्यात आली आहे.

मुंबई महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईत एल वॉर्डमधील प्रभाग क्रमांक १६४ मध्ये सर्वाधिक ६२,९४५ मतदारांची नोंद करण्यात आली आहे. या ६२,९४५ मध्ये पुरुष मतदारांची संख्या ३६,२०४ तर, महिला मतदारांची संख्या २६,७३७ एवढी दर्शविण्यात आली आहे. तसेच, एस वॉर्डमध्ये सर्वात कमी २८,८४७ एवढी मतदार संख्या दर्शवली असून त्यामध्ये, पुरुष मतदारांची संख्या १५,९३४ एवढी तर, महिला मतदारांची संख्या १२,९१२ एवढी दर्शविण्यात आली आहे.

संपूर्ण मुंबईतील २६ वॉर्डमधील एल वार्डमध्ये सर्वाधिक १६ प्रभाग आहेत. त्याखालोखाल, एम/पूर्व विभागात १५ प्रभाग, एस वार्डमध्ये १४ प्रभाग, आर/दक्षिण आणि के/पश्चिम या दोन्ही वॉर्डात प्रत्येकी १३ प्रभाग असल्याचे दर्शवण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, संपूर्ण मुंबईत बी वार्डमध्ये सर्वात कमी २ प्रभाग असल्याचे दर्शवण्यात आले आहे. त्यापाठोपाठ, सी आणि ए या दोन वॉर्डमध्ये प्रत्येकी ३ प्रभाग असल्याचे दर्शवण्यात आले आहे. तसेच, टी आणि एच/पश्चिम या दोन वॉर्डमध्ये प्रत्येकी ६ प्रभाग असल्याची नोंद करण्यात आली आहे.

**सर्वाधिक मतदार संख्येचे प्रभाग**

- वॉर्ड झ प्रभाग क्रमांक झ मतदार संख्या
- एल झ 164 झ 62,945
- के/पश्चिम झ 66 झ 61,579
  आर/मध्य झ 15 झ 59,840

**सर्वात कमी मतदार संख्येचे प्रभाग**

- वॉर्ड झ प्रभाग क्रमांक झ मतदार संख्या
- एस झ 121 झ 28,847
- एफ उत्तर झ 176 झ 30,748
  पी/पूर्व झ 39 झ 32,910




## मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना

# मेट्रो लाईन ९, मेट्रो लाईन २ बीचे टप्पे ३१ डिसेंबरपर्यंत सुरू होणार

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना देणारे मेट्रो लाईन ९ आणि मेट्रो लाईन २ बी या दोन नव्या मेट्रो मार्गांचे निवडक टप्पे ३१ डिसेंबरपर्यंत प्रवाशांसाठी खुले होणार आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) च्या अधिकाऱ्यांनी दोन्ही मार्गांच्या आंशिक उद्घाटनासाठीची तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली आहे.

मेट्रो लाईन ९ ही विद्यमान मेट्रो लाईन ७ची विस्तारित लाईन असून तिची एकूण लांबी १३.५८ किमी आहे. दहिसर पूर्व आणि वेगाने विकसित होत असलेल्या मीरा-भाईंदर परिसरातील दळणवळण अधिक मजबूत करण्यासाठी हा मार्ग महत्त्वाचा ठरणार आहे. पहिल्या टप्प्यात दहिसर पूर्व ते काशीगावदरम्यान मेट्रो सेवा सुरू होणार असून त्यामुळे उत्तर उपनगरांतील प्रवासाचा वेळ कमी होण्यासह वाहतूककोंडीवरही मोठ्या प्रमाणात परिणाम होणार आहे. लाईन ९ वरील नव्याने उभारण्यात आलेल्या स्थानकांवर मेट्रो गाड्या उभ्या असल्याचे दृश्य समोर आल्याने या मार्गाची तयारी जवळपास पूर्ण झाल्याचे स्पष्ट होते. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार स्थानके, ट्रॅक आणि रोलिंग स्टॉक मोठ्या प्रमाणावर तयार असून अंतिम सुरक्षा तपासणी व एकत्रीकरणाशी संबंधित परवानग्यांची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, मुंबईभर मेट्रोचे जाळे विणले गेले असून काही सेवा सुरू झाल्या असून लाखो मुंबईकर मेट्रो सेवेचा लाभ घेत आहेत. यामुळे उपनगरीय रेल्वेवरील प्रवाशांचा ताण कमी झाला आहे.



मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना देणारे मेट्रो लाईन ९ आणि मेट्रो लाईन २ बी या दोन नव्या मेट्रो मार्गांचे निवडक टप्पे ३१ डिसेंबरपर्यंत प्रवाशांसाठी खुले होणार आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) च्या अधिकाऱ्यांनी दोन्ही मार्गांच्या आंशिक उद्घाटनासाठीची तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली आहे.

### प्रवाशांना दिलासा

मेट्रो लाईन ९, मेट्रो लाईन २ बी हे नवे मेट्रो मार्ग सुरू झाल्यानंतर मुंबईतील सर्वाधिक गजबजलेल्या रस्त्यांना पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहेत. सध्या मोठ्या प्रमाणावर रस्ते वाहतुकीवर अवलंबून असलेल्या हजारो प्रवाशांचा दैनंदिन प्रवास सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

### रेल्वेवरचा गर्दीचा ताण कमी होणार

मेट्रो लाईन ९ ही मेट्रो लाईन ७ शी अखंडपणे जोडली जाणार असून त्यामुळे अंधेरी (पूर्व) ते मीरा-भाईंदरदरम्यान अधिक सुलभ आणि वेगवान संपर्क उपलब्ध होईल. यामुळे आधीच ताणाखाली असलेल्या उपनगरी रेल्वे सेवांवरील तसेच मुख्य रस्त्यांवरील गर्दी कमी होण्यास मदत होईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे.

### वाढत्या प्रवासी गरजा भागवणार

मेट्रो लाईन २बीच्या काही टप्प्यांचेही समांतरपणे उद्घाटन होणे हे मुंबई मेट्रो जाळ्याच्या सातत्यपूर्ण विस्ताराचे द्योतक आहे. शहरातील शहरी वाहतूक आधुनिक, सुरक्षित, एकात्मिक आणि शाश्वत करण्याच्या सरकारी धोरणात मेट्रो प्रकल्प केंद्रस्थानी असून वाढत्या प्रवासी गरजा पूर्ण करण्यासाठी हा विस्तार महत्त्वाचा ठरणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# वसई-विरारमधील स्काय वॉकची सुरक्षा वाऱ्यावर

**■वसई। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहरात उभारण्यात आलेले स्काय वॉक म्हणजेच आकाश मार्गिका घाणीच्या विळख्यात सापडल्या आहेत. या मार्गिकांवर मद्यपी, नशेबाज यांचा वावर वाढल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी आकाश मार्गिकेवरून जाणे टाळले असल्याचे बोलले जात आहे. यामुळे या मार्गिका सर्वसामान्य नागरिकांसाठी वापराविना ठरू लागल्या आहे. वसई-विरार परिसरातील विरार पूर्व-पश्चिम आणि वसई पूर्व-पश्चिमला जोडणाया आकाश मार्गिका आहेत. यातील विरार येथील आकाश मार्गिका सतत वादाच्या भोर्वयात असते. विरार पश्चिमेकडील वाहतुकीत अडथळा निर्माण होण्याबरोबरच प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याने येथे मोठ्या प्रमाणात घाण साचली आहे.



मार्गिकेखाली दोन्ही बाजूंना दारूची दुकाने असल्याने अनेक मद्यपी येथेच दारू पिताना दिसून येतात. त्यांच्या दारूच्या बाटल्या याच ठिकाणी पडून असतात. त्याच बरोबर खाल्लेले अन्न टाकले जात असल्याने कुत्र्यांचा वावरही या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे रहदारीच्या वेळी अनेक वेळा कुत्रे महिलांच्या अंगावर धावून गेल्याच्या घटना वाढू लागल्या आहेत.

अशीच परिस्थिती वसई येथील आकाश मार्गिकेवरही आहे. या ठिकाणी फेरीवाल्यांनी आपले बस्तान मांडले आहे. तसेच देहविक्री करणार्यांची हालचाल वाढल्याने सामान्य महिलांना याचा सतत त्रास सहन करावा लागत आहे. काही आंबटशौकीन या मार्गिकेवर उभे राहून महिलांची छेड काढत असतात. त्याच बरोबर प्रेमी युगूलांनी तर या मार्गिकांना हक्काचे स्थान बनवले असून येथे अश्लिल चाळे सुरू केल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. दोन्ही मार्गिकांवर सुरक्षा रक्षक नसल्यामुळे विविध गैरप्रकारांना मोकळे मैदान मिळाले आहे. या आकाश मार्गिकांवर साफसफाई करून रंगरंगोटी करण्यात यावी. तसेच त्या ठिकाणी दररोज नशेबाज लोक बसण्यासाठी येतात, त्यांच्यावर आळा घालावा, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांनी केली आहे.

## सावधान! भाईंदरमध्ये लग्न मंडपात वर-वधु पक्ष भिडले

# लाथा बुक्क्यांनी मारहाण, खुर्च्या, भांडी फेकली

**■भाईंदर। प्रतिनिधी,**

भाईंदर पश्चिमेला असलेल्या एका लग्न मंडपात वर आणि वधूच्या पक्षातील मद्यधुंद सदस्यांमध्ये किरकोळ कारणावरून वादात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. वाद इतका वाढला की दोन्ही बाजूंनी एकमेकांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केलीच, शिवाय खुर्च्या, भांडी आणि इतर वस्तूंनी एकमेकांवर हल्लाही केला. या घटनेत अनेक जण किरकोळ जखमी झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेत भाईंदर पोलीस ठाण्यात १५ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील घटना ही भाईंदर पश्चिमेच्या गीता नगर परिसरातील लग्नाच्या हॉलमध्ये घडली असून रविवारी सायंकाळच्या सुमारास वधू आणि वराच्या कुटुंबात किरकोळ वाद झाला. परिस्थिती इतकी बिकट झाली की दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी केवळ शाब्दिक शिवीगाळ आणि मारहाण केली नाही, तर एकमेकांवर खुर्च्या, भांडी आणि इतर वस्तू देखील फेकल्या, ज्यामुळे काहींना किरकोळ दुखापत झाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डायल ११२ वर घटनेची माहिती मिळाली. त्यानुसार तत्काळ पोलीस हवालदार मोटे व महाले घटनास्थळी पोहोचले. लग्न मंडपात मोठा राडा सुरू असल्याचे पाहून त्यांनी पोलिसांना बोलावण्यात आले, त्यानंतर सात मद्यपींना ताब्यात घेण्यात आले. शिवाय, लग्न समारंभाच्या व्हिडिओग्राफी आणि तक्रारदाराने चित्रित केलेल्या व्हिडिओ क्लिपच्या आधारे, महाराष्ट्र दारूबंदी कायद्यासह भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांनुसार सार्वजनिक ठिकाणी मद्यधुंद अवस्थेत अव्यवस्था आणि शांतता भंग केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पोलीस तपास सुरू आहे.

### पोलिसांचा तपास

इतकेच नव्हे तर, हत्येनंतर आरोपी जोडप्याने पीडितेच्या घरातून चोरी केली. त्यांनी मृत महिलेचे सोन्याचे दागिने, एक मोबाईल फोन आणि काही रोख पैसे घेऊन फरार झाले. पोलिसांनी या प्रकरणाबाबत माहिती देताना सांगितलं की, संबंधित घटनेची माहिती मिळताच पोलीस पथकाने तात्काळ कारवाई केली आणि अवघ्या २४ तासांत आरोपी मोहित यादव आणि अंजली चौहान यांना अटक केली. आरोपींनी हत्येच्या वेळी घातलेले रक्ताने माखलेले कपडे, चोरीचे सोन्याचे दागिने, मोबाईल फोन आणि ७३,६४० रुपये रोख जप्त केले. या खळबळजनक हत्येचा उलगडा करणाऱ्या पोलिस पथकाला ५०,००० रुपयांचे बक्षीसही जाहीर करण्यात आलं आहे.

# महिलेचे विवाहबाह्य संबंध, प्रियकराकडून गर्भवती राहायचं होतं पण...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

विवाहबाह्य प्रेमसंबंधातून एक धक्कादायक घटना घडल्याची बातमी समोर आली आहे. संबंधित घटना उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे घडल्याची माहिती आहे. येथील रहिवासी असलेली अनुपमा पटेल नावाची विवाहित महिला अंगणवाडी शिक्षिका असून एकटीच राहत होती. दरम्यान, अनुपमाची मोहित यादव नावाच्या तरुणाशी ओळख झाली. कालांतराने, त्या दोघांमध्ये जवळीकता वाढत गेली आणि त्यांच्यात शारीरिक संबंध सुद्धा निर्माण झाले. खरं तर, अनुपमाला मोहितपासून गरोदर व्हायचं होतं, पण त्या तरुणाला हे मान्य नव्हतं. अनुपमा नेहमी तिच्या प्रियकरावर मूल होण्यासाठी दबाव आणत होती. याच कारणाला वैतागून, मोहित आणि त्याच्या पत्नीने मिळून अनुपमाला संपवलं.




### प्रियकरावर अनैतिक संबंधासाठी दबाव...

अनुपमा पटेल उर्फ सीता ही लाक्षमाणपूर येथील शारदा विहार कॉलनीत राहत होती आणि ती तिच्या घरातूनच दुधाचे पॅकेट्स विकून पैसे मिळवायची. मोहित सुद्धा त्याच कॉलनीत भाड्याच्या घरात राहत होता. मोहित बऱ्याचदा अनुपमाकडे दूध घेण्यासाठी यायचा. दरम्यान, त्यांच्यात बोलणं वाढत गेलं आणि कालांतराने त्यांच्यात संबंध निर्माण झाले. खरं तर, अनुपमाला मोहितकडून मूल हवं होतं आणि त्यामुळेच तिने मोहितवर अनैतिक संबंधासाठी दबाव आणल्याचा आरोप आहे. यासाठी, मोहितने नकार दिल्यावर तिने त्याला पोलीस तक्रारीत अडकवण्याची धमकी दिली. दरम्यान, मोहितने अंजली नावाच्या तरुणीसोबत लग्न केलं. परंतु लग्नानंतर सुद्धा अनुपमा त्याच्यावर तिच्याशी लैंगिक संबंध ठेवण्यासाठी दबाव आणत होती.

### बायकोसोबत मिळून केली प्रेयसीची हत्या

यामुळे वैतागलेल्या मोहितने अंजलीला अनुपमाबद्दल सांगितलं. त्यानंतर, त्या दोघांनी मिळून अनुपमाला संपवण्याचा मोठा कट रचला. योजनेप्रमाणे, मोहित आणि अंजली आधी पांडेपूर येथील मिश्रा होमस्टेमध्ये राहिले. ११ डिसेंबर रोजी सकाळी ते अनुपमाच्या घरी निघाले. त्यावेळी, अंजली अनुपमाच्या घरापासून काही अंतरावर थांबली आणि मोहित मागच्या दाराने पीडितेच्या घरात घुसला. त्याने अनुपमाच्या डोक्यावर, चेहऱ्यावर आणि मानेवर दगडी सील आणि स्टीलच्या ड्रमने वार करून तिची हत्या केली.

# लेकीच्या ११ वर्षीय चार मैत्रिणींना बापानं दुसऱ्या मजल्यावर नेलं... पीडित नातेवाईकाच्या गुप्तांगावर...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यातील वाशिमच्या मालेगाव शहरात एका 11 वर्षीय लहान मुलीसोबत अश्लील चाळे केल्याचं वृत्त समोर आलं. या प्रकरणात पीडितेच्या कुटुंबियांवर देखील आरोपीने प्राणघातक हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी आता पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. प्रकरणात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मालेगाव शहरातील गांधीनगर परिसरात राहणाऱ्या गुणरत्न अरविंद पाखले यांनी आपल्याच ११ वर्षीय मुलीच्या चार मैत्रिनींना दुसऱ्या मजल्यावर नेलं आणि नंतर त्यांच्यासोबत लज्जास्पद कृत्य केलं. या घटनेनंतर चारही मुलींनी घडलेल्या घटनेचा सर्व प्रकार आपल्या कुटुंबियांना सांगितला होता. तेव्हा पीडितेचे कुटुंबीयांनी आरोपीच्या घरी धाव घेतली होती. तेव्हा गुणरत्न पाखलेनं अचानक खिशात लपवलेल्या स्टीलच्या टोकदार कंपासने आणि टिनच्या एका लहान तुकड्याने हल्ला केला. या हल्ल्यातील तरुण आदित्य नाईकवाडे हा मुलीचा नातेवाईक, गंभीररित्या जखमी झाला होता. त्याच्या मानेवर आणि गुप्तांगातील भागांत आरोपीने हल्ला केला, तेव्हा त्याला खोलवर जखमी झाली होती. पीडित कुटुंबियांच्या तक्रारींवरून, मालेगाव पोलिसांनी आरोपी गुणरत्न पखाले विरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षणच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला. त्याला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायाधीशांनी त्याला एमसीआरमध्ये पाठवले. याच प्रकरणात पोलीस अधिकारी पांडुरंग इंगळे यांनी सांगितलं की, "आरोपीवर पॉक्सो अंतर्गतच्या भिन्न कलमांन्वये गुन्हा दाखल करून न्यायालयात हजर करण्यात आले होते."



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com